# तेजशलाका

(जीवनपर कवितासंग्रह - भाग २)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**तेजशलाका** (जीवनपर कवितासंग्रह - भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. ८, शके १९४५,
रविवार, दि. १७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-962298-5-6

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण



जीवनाचा अर्थ समजावून सांगताना
जीवनाला अर्थ देणाऱ्या माझ्या सर्व गुरुजनांना
हा जीवनपर कवितासंग्रह
सदार सविनय
समर्पित

# मनोगत

जन्म व मृत्यूच्या मधल्या कालावधीला जीवन म्हणतात. हा कालावधी अनिश्चित असतो. माणसे श्वास घेतात हे खरे पण जगतात का? हा प्रश्नच असतो. मुळात जीवनाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन अतिशय वेगवेगळा असतो अथवा कधी कधी तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच विकसित झालेली नसते.

कविमनाने जगण्याच्या प्रत्येक पैलूवर मन विसावते तेव्हा जीवनपर कविता उतरत जातात. हा दृष्टिकोन जरी कवयित्री म्हणून माझा असला तरी तो रसिकहृदयाचा ठाव घेणारा असल्याने त्याचेच जीवन उलगडवणारा ठरतो.

जीवन म्हणजे तर सोपे, म्हटले तर अवघड, केवळ त्याला जगताना मनात एक उमेद जिवंत हवी, कुणाचा स्नेह, कुणाचे वात्सल्य, कुणाची ओढ हृदयात हवी. भोवतालच्या प्रत्येक बाबीत जीवन जर गवसू लागले तर मग त्याचा नव्याने शोध घेण्याची गरजच पडत नाही.

रसिकांना या जीवनपर कविता जीवनासाठी हव्या हव्याशा वाटतील, तरच या सफल होतील.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) डोह एक खोल खोल ... ७
२) नंदादीप ... ८
३) मुक्त मी ... ९
४) उगवतीसंगे उगवते ... १०
५) स्वच्छ नदीच्या काठी ... ११
६) रम्य एक स्वप्न ... १२
७) आरसपानी जीवनगाणी ... १३
८) सारं भाग्य ठरवतं ... १४
९) कातळ पाषाणातून ... १६
१०) होऊन धबधबा ... १८
११) जगण्याची ही उर्मी अशी की ... २०
१२) हे चक्र ऋतूंचे ऐसे ... २१
१३) दव पानावरचे ... २२
१४) कुठे गेली ती सकाळ ... २४
१५) मौनाचे पहाड ... २६
१६) संथ वाहताना मला ... २७
१७) सोनपिवळी फुलं ... २८
१८) असा टाक, असा बोरू ... २९
१९) खेळ दावितो डोंबारी ... ३०
२०) शोधू कुठे निवारा ... ३१
२१) रांगोळी रांगोळी ... ३२
२२) उत्कट तुझी ही प्रीती ... ३३
२३) क्षण मनात राहणारे ... ३४
२४) मी गातो गाणी ... ३५
२५) अशाच भेटी होत जाव्यात ... ३६
२६) कुंचला फिरला पहाटे ... ३७
२७) ही नाजूकता ... ३८
२८) कसे जगावे ... ३९
२९) तू शबरी ... ४०
३०) आकाशाने भाळावरती ... ४२
३१) प्रेम अपूर्ण की प्रेम पूर्ण ... ४३
३२) सांगा दिव्यांना एवढे ... ४४
३३) रोज सकाळी एक सोनेरी ... ४५
३४) देव तेवढे देतो की ... ४६
३५) जगावेगळ्या कळ्या तिच्या ... ४७
३६) पंचमहाभूतांचे विश्व ... ४८
३७) मी जगण्यावर फिदा ... ४९
३८) ते बालपण ... ५०
३९) मी कधी जिंकून आले ... ५१
४०) हास्य माझं ... ५२
४१) घट्ट मैत्री ... ५४
४२) येरे येरे पिल्ला ... ५६
४३) माझ्या डोळ्यात विठूला ... ५७
४४) गावाची पायवाट ... ५८
४५) का येतसे शहारा ... ५९
४६) प्रेमाचं झाड ... ६०
४७) मोरपिसे ... ६१
४८) मोती शिंपल्यातला ... ६२
४९) इच्छा दुर्दम्य ... ६३
५०) नवी सुरुवात ... ६४

५१) एकल्याने चालणे ... ६५
५२) रोज उठू या ब्राह्ममुहूर्ती ... ६६
५३) त्याच्या कृपेच्या कैैक पाकळ्या ... ६८
५४) पुस्तक मित्रा ... ६९
५५) चाफ्यामध्ये चाफा ... ७०
५६) कलश फुलांचा ... ७१
५७) डोंगर खोदून ... ७२
५८) कसलं वैर ... ७३
५९) पोपटांची शाळा ... ७४
६०) अरे रे दोस्ता ... ७६
६१) जरी असलो मी काटेरी ... ७७
६२) असेच सौख्य नांदू दे ... ७८
६३) हास्य मुखीचे ... ८०
६४) वासराच्या संगे नाते ... ८१
६५) अगा गोड बालपण ... ८२
६६) बकुळफुलांची ... ८३
६७) सत्त्वभाव चांगला ... ८४
६८) वात्सल्याचा गडद रंग ... ८५
६९) रूप वेगळे वेगळे ... ८६
७०) सुखाची मोजकीच फुलं ... ८७
७१) आनंदाचे मेघ पाहू दे ... ८८
७२) जगण्याला अर्थ असावा ... ८९
७३) अवघा पिंपळवृक्ष उभा ... ९०
७४) लेखणी ... ९२
७५) मन कंदील कंदील ... ९४
७६) मालवताना कुडी जीवाची ... ९५
७७) ओढ मनाला मनाची ... ९६
७८) अक्ष ... ९७
७९) एक मन... ... ९८
८०) चिन्हे नुरतील ऐलतीरी ... ९९
८१) तूऽऽ, माघार घेऊ नगंस ... १००
८२) धावे माझा गिरीधारी ... १०१
८३) शोधू द्या मार्ग मला ... १०२
८४) सरले मळभ सारे ... १०३
८५) अडगळ वेडी ... १०४
८६) भरभरून रसपान ... १०५
८७) पावसा स्पर्शीले मी त्या ... १०६
८८) देवा रं देवा ... १०७
८९) उत्साहाची एक लहर मग ... १०८
९०) एक भरारी ... १०९
९१) गाव नवखा जाहला ... ११०
९२) तिथल्या पाऊलखुणा देखण्या ... १११
९३) ओलावा तिथे खास ... ११२
९४) फसवी वेळ ... ११४
९५) शिकवण सोपी धर्माची ... ११६
९६) बेट ... ११७

## (१)
## डोह एक खोल खोल

डोह एक खोल खोल
वर पाहता अबोल
आत वादळ उसळे
कुणा कधी न च कळे

एक दुःखाचा हा डोह
गप्प आसवे गिळतो
आत खारेपण घेत
किती प्रसंग पाळतो

एक डोह आनंदाचा
सळसळ लाटा करी
आत लपल्या दुःखाला
थोडा विसर तो खरी

एक डोह चिंतारुपी
माणसाला खात जाई
एका डोहातुन दुजा
भोवऱ्यात नेत राही

एक काळजीचा डोह
चेहऱ्याला वृद्धपण
मन अस्थिर अशांत
अस्वस्थ कण कण

डोह नको अंतरी हे
साठलेले भावपाणी
भडा भडा हो बोलून
वाट करू झऱ्यावाणी

खळखळत्या पाण्याला
एक सुवास स्वछसा
नाद भिडतो हा कानी
नात्या मध्ये सेतू जसा

डोह दुर्गंध नि घाण
विष कालियाचे स्थान
त्याला मारणे हे जिणे
होऊ कृष्ण अभिमान

जळ नितळ करूया
आनंदाची जलक्रीडा
कृष्ण अंतरात्मा जागा
संसाराची नच पीडा

पांग डोहाचे फिटते
जल अमृताचे होते
अध्यात्माचा स्पर्श होता
जळ गवळण गाते
डोह सरोवर होते
रम्य सरोवर होते!!!

९/१२/२०२३,
१७:०१



## (२)
## नंदादीप

नंदादीपाची सय सारखी
कधी न होते ज्योत पारखी

सांजवेळी ती देते प्रकाश
दिवस सारा अंतरी आस

देवाजवळी तेवत राहणे
साक्षीभावाने सारे पाहणे

जळून स्वत: उजळून देणे
कळून सारे आकळू न देणे

ना शब्द काही, सुखदु:ख नाही
अखंड तेवून तेजासी पाही

जीव होऊ दे निज नंदादीप
आपुला प्रकाश दावी प्रदीप

ही ज्योत इथली तेथ मिसळू दे
उधाण आनंदा मुक्ती उसळू दे

दि. ०२/०९/२०२२
सकाळी १०.११ वा.

## (३)
## मुक्त मी

व्यक्त की ऽऽऽऽऽऽ अव्यक्त मी
भुक्त की ऽऽऽऽ मुक्त मी...

या भावना, संवेदना, जंजाळ अन मी
गुंतणे साऱ्यातुनी तरीही मुक्त मी...

लेपणे विलेपणे, तरीही अलिप्त मी
देह होई चंदनाचा, गंध मी मुक्त मी...

देव देव्हाऱ्यात आहे, की कणी कणी
आराध्य तो भक्त मी, अन मुक्त मी...

कोश सारे आत वेडे गुंतले की
एक एक धागा सुटता मुक्त मी...

दि. ०२/०९/२०२२
सकाळी १०.२६ वा.



## (४)
## उगवतीसंगे उगवते

उगवतीसंगे उगवते
ध्येय आशा दृढतरा
जायचे मज जायचे
त्या कठिणही मार्गा वरा

व्हायचे मी व्हायचे
जगतास आदर्श खरा
थांबणे न च थांबणे
विश्रांती नाही क्षण जरा

विश्वास माझा मजवरी
दुर्दम्य इच्छा मम उरी
सागराची शक्ती येते
थेंब त्याचा छोटा जरी

मन ना दमते तीच ताकद
तनही चाले बळ किती
आत उगवून येता सविता
थांबणे ना कसली भीती

पाहणे मी पुढेच पाहणे
ध्येयपथ  मज गाठणे
जिंकिले की जगताला मी
ध्येय मिळवून वाटणे

मेहनत खरी नच थांबणे
मीच मजला चेतवून
आत आपुल्या एक द्यावी
ज्योत काजवी तेववून

दि. २९/०८/२०२२
सकाळी ०८.२३ वा.



## (५)
## स्वच्छ नदीच्या काठी

निवांत क्षणी मी असा विसावे
स्वच्छ नदीच्या काठी
सोडून साऱ्या चिंता आणिक
काळज्या टाकून पाठी

एक दुवा हा निसर्ग ठरतो
ईश्वर मानवामध्ये
असे वाटते तोच बोलतो
शांत जळाच्या मध्ये

वर आकाशी रंग निळे अन
मेघ शुभ्र जे जमले
मन माझे किती सहजी येथे
सौंदर्य पाहण्या रमले

डोंगर सजले हिरवाईने
काठावरती मी
दंग जाहलो रंग लेवूनी
सृष्टीसंगे मी

मनात कितीसे काही साठले
संपून गेले सारे
अंगांगाला स्पर्शून बोलती
धुंद मंद हे वारे

ती भाषा किती वाटे आपुली
जिथे शांतीही बोले
रोमरोम माझे आनंदी
मन आनंदी डोले

म्हणून येतो वरचेवर मी
टेकण्या इथे जरासे
श्वासामध्ये घेतो भरूनी
ताजेतवाणे मिराशे

दि. २३/०८/२०२२
सकाळी ०६.४३ वा.

## (६)
## रम्य एक स्वप्न

रम्य एक स्वप्न ते
आजही खुणावते
मिटुनी लोचने प्रिया
मोद मी दुनावते

विश्व ते असे खरे
की स्वप्न भास वाटते
कणा कणात आजही
प्रेम तेच साठते

तू खरा सांग कुठे
त्या तिथे की या इथे
स्वप्नमार्ग चालते
की सत्य स्वप्न भासते

मी अनादी मी अनंत
त्याच स्वप्नी जागते
जागताच सारी माया
मोक्षपथी लागते

जागेपणी झोपणे अन
झोपताच जागणे
दे रे प्रिया माझ्या राया
मुक्ती हेच मागणे

विश्व असे स्वप्न की मी
जागता न जागते
जागले आता तुला न
अन्य काही मागते

एकरूपता अशी की
मी तुझ्यात वाहिली
कृष्ण वाटे राधिका नि
राधिका स्थिरावली

जन्म असे चक्र की
तू चक्र तेच रेखिले
मी देऊनी तुला मला
कृष्णरूपी देखिले

आज स्वप्न भंगले की
भंगली ही वासना
तुझ्या विना तनामनास
अन्य काही आस ना

दि. ९/१२/२०२३,
१७:१३

## (७)
## आरसपानी जीवनगाणी

आरसपानी जीवनगाणी
गायिलीस तर कळतील ना
आरोहातील उंच तान अन
अवरोहातील खोल खुणा

नितळ गाणे जीवन म्हणजे
उगाच गढूळ करतो ना
किती बुडबुडे लोभमोहाचे
आविर्भावे स्मरतो ना

रियाज थोडा, घसा कोरडा
गायन बेसूर होईल ना
प्रेमाची ही गुरुची थापड
सप्त सुरांप्रत नेईल ना

स्वच्छ नितळ या आयुष्याला
सूर सुरातील देऊ या
गळा तयारी, मळा फुलवुनी
सुरांगणी या नेऊ या

गाणे ऐसे दिव्य प्रकटले
गंधर्वांना नवलाई
आरसपानी जगण्यासाठी
प्रतिबिंबाला हो घाई

९/१२/२०२३,
१७:२१

## (८)
## सारं भाग्य ठरवतं

कोण जीवनात येई
सारं भाग्य ठरवतं
आयुष्याचं चित्र बघ
भाळपट्टी गिरवतं

आम्हा वाटते हे हवं
आम्हा वाटते ते नको
पोतडीत काळाच्या त्या
गोष्टी किती नि कोणत्या

आम्ही चित्र रेखाटतो
रंग मनाचे आमुच्या
एक कुंचला फिरतो
जन्मा आधीच कुणाच्या

इथं गणित सुटेना
कोडी अनादी अनंत
तिथं हिशोबाच्या वह्या
चोख ठेवतो निवांत

ज्याचं बघावं ते स्वप्नं
त्याच्या गावी आम्ही नाही
ज्याला आमुची ही ओढ
त्याची जाण आम्हा नाही

ठरलेले दोन पक्षी
एक घरटं मांडती
काडी काडी जमवून
त्याला किती शृंगारती

पिलं जन्माला येती
गोड चिव चिव त्यांची
दाणा पाणी चोचीमध्ये
माय ऊब सारी देती

उंच गगनी उडाया
बळ पंखात आणत
धडे उडण्याचे देते
माय पक्षीण क्षणात

जसं उडायला येतं
पिल्लं नभी विहरती
आपुल्या ते घरट्याच्या
कसे असे विसरती

एका निवांत क्षणाला
पट सारा डोळ्यापुढे
काय चुकलो जगलो
मांडू हिशोब बापुडे

कसे घडले ते सारे
नाही आपुल्या हे हाती
आता कळून चुकते
चित्रकाराची महती

आता त्याचे चित्र मनी
रेखाटण्या होते घाई
साऱ्या धावपळीमध्ये
त्याला पहिलंही नाही

कल्पनेचा तो कुंचला
अंतराम्याच्या पटली
जीव शिव एक रंग
आता खुण सापडली

एक चित्र सुंदरसे
आपोआप रेखाटले
चैतन्याचे चित्र होता
चक्र जीवाचे फिटले

आता चित्रकार चित्र
दोन्ही असे धवंलकी
एक प्रकाश कांतीने
इंद्रधनुष्याची झाकी

एका रंगाचीच रूपे
एक प्रकाश लागतो
सारे एकरूप होता
नाद स्वर्गीय लाभतो

ज्याला संचित म्हणती
सत्कर्माने घडते
ओढ जीवाला शिवाची
पुण्याईने ती जडते

दि. २३/६/१९
९/१२/२०२३, १७:२१



## (९)
## कातळ पाषाणातून

कातळ पाषाणातून
कोंब कोवळा उगवे
नाजुक पानं त्याची
रंग कोमल जागवे

ऊनासाठी उंच जाई
पाणी कोठून ते घेई
खडक पाझरतो
आतून आई होई

कठोर त्याचं रूप
बाहेरून देखता
बीज हृदयी प्रेमाचं
आत वाकून पाहता

किती निंदा कोणी करी
म्हणे रुक्ष हा डोंगर
एक इटुकले रोप
करी त्याला हो सुंदर

पाहून बाह्यरूपा
करू नये कधी मत
आत मृदुसा कोपरा
असे प्रत्येकाच्या आत

तो जेव्हा पाझरतो
एक भाव जन्मा येतो
अपवादही असाच
गोंडस खूप होतो

रोपट्याला पाहताना
होई डोंगर हळवाना
आतली गुप्तगंगा
मुळाशी वळवाना

आधार स्वकीयांचा
बहरण्याला पुरेसा
डोंगराएवढा की
रोपाचा हो भरोसा

डोंगर रोपा पाही
हळूवारताही माझी
रोप डोंगरा पाहता
कणखर मुळ त्याची

एक चैतन्याची लाट
वाऱ्यावर डोलता
कष्टातुन उभा मी
कळे डोंगर बोलता

दूर अरण्यात गूज
चाले दोघांचेही रोज
साथ परस्परा देती
एक अनोखी ही मौज

कुठे जन्मलो हे नसे
महत्वाचे तितुके
कसे राखले जीवाला
सांगावे की इतुके

दि. २६/६/१९
रात्री ८.४३ वा.



## (१०)
## होऊन धबधबा

होऊन धबधबा
कोसळू या जरा
झोकून उंचावरून
स्पर्शू या युगंधरा

विश्वास तिच्यावर
घेईल झेलून ती
माझे उनाडपण
सांभाळेल जी

ओघ पाण्यातला
ओढ वाहण्याची
मी न राहे माझा
मज त्वरा पाहण्याची

डोंगरकड्यावरूनी
स्वतःस सोडतो मी
कडा पायथ्यास ऐसे
कोसळून जोडतो मी

शुभ्र फेसाळत्या
धारा जणू दुधाच्या
उडती तुषार वेगे
क्षणवेळा मधुर मधाच्या

रव माझा मदांध भासे
भय रात्रीस आणणारा
शृंगार कोणी फुलवे
भिजताच ये शहारा

प्रियजनास कोणी
प्रेमात चिंब करते
माझ्यापरी तयांच्या
मन धबधब्यास ये भरते

मी कोसळून अंगावर
मनमोर रंगात आणतो
शीतल स्पर्श माझा
रोमरोमातही भिनतो

ओल्या तना मनाशी
संवाद निःशब्द होतो
भाव प्राजक्त तेव्हा
बोलून सारे जातो

किती लाजतात ललना
रती होत कामदेवाच्या
शृंगार शिखरी जातो
शिव झाकतो त्रिनयना

येथेच कोणा दिसती
ज्ञानाच्या शांती रेखा
तप चालते निरंतर
भंगण्याचा नाही धोका

मुनी ऐसे देखताच
लेऊन आत्मरस हा
मी होऊनी विरक्त
जगतात विरस ऐसा

कोणास वाटतो मी
अलंकार निसर्गाचा
अनमोल रत्नहार
घसरला की स्वर्गाचा

कोणास वाटतो मी
मंदाकिनीचा राग
येण्यास पृथ्वीतलावर
हा शाप कीं अनुराग

मी काहीच ना पाहतो
बस कोसळतो कोसळतो
होऊन धबधबा
भूचरणाशी लोळतो

आवेगे उसळता मजला
ती सांगे शांत वाहण्या
रूपे दोन्ही धावे माझी
नदी सागरास पाहण्या

दि. २७/६ १९
मध्यरात्री १२.०७ वा.




## (११)
## जगण्याची ही उर्मी अशी की

खुडल्या फांदीच्या खोडावर
रूप चिमुकले झाडाचे
जगण्याची ही उर्मी अशी की
कौतुक वारस खोडाचे

कुणी चालवी कुऱ्हाड जेव्हा
झाड बहरले कोसळते
डोळ्यादेखत स्वमरणाने
धैर्य तयाचे ढासळते

किती वर्षांची घोर तपस्या
कोंबाला ते झाड बनवते
ऊन वारा पाऊस झेलत
सोशिकतेने त्याला तगवते

बहरू येण्या आयुष्य जाते
छाटण्यास क्षण एक पुरेसा
कृतघ्नतेने वार झाले तरी
सोडत नाही जीवन आशा

झाड संपुनी खोड राहते
चैतन्याची धार वाहते
एक कोंब हळुवार डोकवे
झाड बालपण पुन्हा पाहते

फुटता अंकुर झाडाला बळ
सोशिकतेचे मिळते ते फळ
नव्या रुपाला जन्मा घालून
खोड जनक हा होई सफळ

सारे संपले असे वाटता
अंतरातला कोंब जागवा
स्नेहधारेने रस पोसवुनी
पुनर्जन्म हा इथे जगावा

जगण्याची ही उर्मी अशी की
मरणालाही थारा नाही
जीवन अमूल्य बनवू असे की
झाडाकडून शिकू या काही
झाडाकडून शिकू या काही

दि. २६/६/१९
सकाळी ११.१५ वा.



## (१२)
## हे चक्र ऋतूंचे ऐसे

हे चक्र ऋतूंचे ऐसे
परमेशाने निर्मियले
गर्वात बुडाल्या वसंता
शिशिराने भानी आणले

फळा पाना फुलांचा जेव्हा
बहर उतू हा गेला
फुंकर मारूनी त्यावर
वृक्षास निष्पर्ण केला

सालंकृत श्रीदेहाची
निरलंकृत काष्ठे होता
संयम खोडांतरीचा
झाडाला तगवीता

काळाचे बलशाली मग
चक्र फिरूनी येते
मृतप्राय लाकूड येथे
नाजूक पल्लव ल्येते

तो गर्भरेशमी शेला
अंगावर असा का आला
संपताही सारे सारे
आतून जीवनरस ओला

विरहिणी कशी जगते ना
शब्दात मांडणे नाही
देहावरच्या लेण्यांना
मरणयातना काही

पण येईल राजस माझा
आतुरतेने भेटाया
मीलनक्षण एक पुरेसा
उत्कंठा शिगा गाठाया

निःशब्द तपांच्या पोटी
शब्दसुमन रामायण
वेदना माय होऊनी
प्रकटती वेद ज्ञानायन

अभिशाप मानता याला
की वरदानाची भूमी
नास्ति नास्तिच्या घोषे
अस्तित्व जाणिले हो मी

दि. २८/६/१९
सकाळी ८.१६ वा.



## (१३)
## दव पानावरचे

दव पानावरचे
हसू गालावरचे
थेंब मोतीया
आनंदाचे

थेंब उजळतो
रंग पानाचा
रंग पान
देई थेंबा

एकरंगी प्रतिबिंब
पाहता
परस्परांना
तनी शिरवा

तरारून दव
तरारतेपण
पाना मिळते
आंदण दान

शिशिरातल्या
गळतीपूर्वी
मौक्तिक सालंकृत
कन्यादान

दव टपोर
भावविभोर
माया माहेराची
शिदोरी फुलविण्याची

दव रोमांच
साजनस्पर्शी
रतीराणीचे
लज्जाभाव

दव गर्भातील
जीव बुडबुडा
प्राणांचा हा
कोश लहान

दव चिमुकल्या
बाळ ओठीचा
लाडिक पापा
हळूच टिपा

दव रमणीच्या
गालावरती
टपटपणारे
मोती टपोरे

दव वृद्धपणी
आसुसलेपण
स्मृतिबिंदू
आधारखणी

ऐेक दवा रे
थांबून जा ना
हृदय पाकळी
घे विश्राम

कधी न मिटशील
तेथून राजा
स्मृती राऊळीचे
परमधाम

दवात दर्शन
श्रीरामाचे
एक सोहळा
अति अभिराम

दि. २९/६/१९
सकाळी ८.५१



## (१४)
## कुठे गेली ती सकाळ

कुठे गेली ती सकाळ
आता दिसतंच नाही
देवपूजेसाठी फुलं
घ्यायला कोणी नाही

आधी असे सोहळा
सकाळराणीचा
पहाटेच्या गोड क्षणी
झोप सोडण्याचा

उठताच आधी
देवघरापुढे उभा
राहूनिया नजरेने
देव पाहण्याला

सारं काही त्याच्या
कृपेमुळे आज आहे
अशीच कृपा राहो
हे त्याला सांगण्याला

घरादाराची झाडून
स्वच्छता होई
दारापुढे सडा रांगोळी
सजून जाई

श्लोक उच्चारणा सवे
मंगल ते स्नान
साऱ्या नद्या होत गोळा
होता आवाहन

स्नानातून येई शुद्ध
पावित्र्याचा वास
केस धुतल्या आईचा
पसरे सुवास

छान साडी नेसून ती
अंगणात जाई
हातातल्या परडीत
फुलं गोळा होई

जाई जुई प्राजक्त नि
बकुळ सावळा
सदाफुली मोगरा नि
गुलाब पिवळा

तुळशीची मंजिरी
गोपालकृष्णासाठी
गंधभरा मरवा नि
आंब्याची ही फाटी

झाडावेळींजवळ ती
जाता हळुवार
आपसुक देती फुलं
त्याही अलवार

मग आई पूजेसाठी
अंगणात जाई
संस्कृती घराची पूजे
तुळशी ही माई

प्रदक्षिणा घालताना
वर मागतसे
सारे तिचे पावित्र्य
जीवनी आणतसे

मग होते घरामध्ये
देवपूजा मोठी
स्तोत्र, मंत्र, नैवेद्य नि
धूप, पंचारती

सारेजण आरतीला
सोबत जमती
घर सारे देवांच्या
सेवेला दिमती

मग आनंदाने सारे
प्रसाद भक्षिती
कुळपरंपरा
मिळूनिया रक्षताती

तळहाती तीर्थ येता
भक्तिभाव जागा
मनातल्या मनात
साऱ्यांसाठी सुख मागा

कुठे गेली सकाळ ही
शोधून थकले
परक्यांच्या मागे जाता
भारतीयत्व विकले
भारतीयत्व विकले

दि. २९/६/१९
सायं. ७.१५

## (१५)
## मौनाचे पहाड

मौनाचे पहाड उभे
किती सोसले चटके
लाव्हारस उसळता
अंग लाही लाही झाले

गर्भातून फेकताना
अनोळखी जगतात
काय कोणासी बोलावे
कोण मला जाणतात

सैरावैरा जीव धावती
उष्मा असह्य अतिदाहक
पृथ्वीच्या उदरातून बाहेर
तप्त लोंढे अग्निवाहक

युगे किती उलटून जाती
मग प्रस्तर होती थंड
खडकांचा डोंगर होतो
की अभेद्य आणि अखंड

मूळ सोडून प्रकृती
संकटांनी झालो शांत
किती वेदना झेलून
बसलो वनी निवांत

आज अबोल निःशब्द
अनुभवाचे भांडार
मी बोलंतच नाही
दूषणं देई हा संसार

मौनाचे तप मोठे
आत झाकता कळते
वास्तवाची जाण होता
प्रौढी सारीच गळते

होत मौनाचे पहाड
शिखरांनी नभी जावे
वाचाळवीरापेक्षा
कृतीने उत्तरावे
कृतीने उत्तरावे

दि.२८/६/१९
वेळ सायं. ७.३२



## (१६)
## संथ वाहताना मला

संथ वाहताना मला
लाभतो शांत भाव
किती लहरी उठती
जळ चंचळ स्वभाव

तरी लाभते वळण
एका वळणवाटेला
लहरींचा जोर कमी
शांत झुडुपे तीराला

शांत स्वच्छ माझ्या जळी
प्रतिबिंब सारे शांत
झाडं झुडपे मौनात
परिसर हा निवांत

कधी बोलण्या स्वतःशी
अशी शांतता हवीशी
आत डोकावून पाहू
शोधू स्वतःला नवीशी

दि. १/७/१९
सायं. ८.१४ वा.




(१७)

**सोनपिवळी फुलं**

सोनपिवळी फुलं उमलली
हास्य किती हे गोड
फुला पाहुनी कळी उमलते
फुलणे ते अजोड

फुलणे सोपे नसते काही
किती करावा त्याग
रूप सारखे बदलून घ्यावे
नित्य नवा हा साज

हट्ट सोडता बीजाने
खपवून घेता मातीत
अंकुर सान वर वर येतो
भेग भुईच्या छातीत

ऊन साहणे सर झेलणे
वारा वेडा पिसा
उंच वाढण्या एकच पथ्य
या साऱ्यांवर भरवसा

हळूहळू आकारा येई
रोप अंकुराचे
कोंब कळीचा डोकावतो
अन वेध लेकुराचे

फळ बहरण्या कळीने
आधी स्वतःस फुलवावे
ऋतुराजाला आनंदाने
कवेत झुलवावे

एक एक पाकळी
नव्या रंगात न्हाऊनी येते
रेशिमस्पर्शी पराग कोशी
फूल कळीचे होते

आता फळाला आस लागली
कधी मी ये आकारा
त्यासाठी रे सुकवून देणे
फुला तुझ्या शरीरा

किती वेळ मग मिळतो फुलाला
स्वतःस खुलविण्या
सदा हसून ते कसर न सोडी
कळीस फुलविण्या
कळीस फुलविण्या

दि.२/७/१९
सायं. ७ .२० वा.




## (१८)
## असा टाक, असा बोरू

टाक बोरूचा प्रवास
युगे शाईची अक्षर
सारा इतिहास इथे
भूर्ज पत्री हो साक्षर

दर्जेदार लाकडाला
कोरून होई बोरू
टाक शाईत बुडवूनी
लेखन सुरू करू

टाक बोरूचे गं रूप
मोरपिसाने सजवू
पंख रंगीत पक्ष्याचा
त्याच्या टोकावर जोडू

एक टोक लिहिताना
पंख सांगे झेप घेना
मोरपीस शारदेचे
ज्ञान वेच कण कणा

आजही गिरवावा
श्रीगणेशा बोरूने
टाक लिहीतो अक्षर
मोत्याच्या रूपाने

विचार ओघवते
न खोडण्याची भीती
एकटाकी लिखाण ते
सारे बुद्धी गौरविती

असा टाक, असा बोरू
लिहिता सदा राहो
सरस्वतीच्या कृपेने
शब्द ब्रह्म नित पाहो

दि. २/७/१९
रात्री ८.११



## (१९)
## खेळ दावितो डोंबारी

खेळ दावितो डोंबारी
त्याच्या आयुष्याची दोरी
जीवप्राण पोरं पोरी
खेळ करती अघोरी

कशासाठी कशासाठी
उपाशी त्या पोटासाठी
खळगी भरायची भरायची
दोरी तरायची तरायची

बाप छातीवर झेलतो
काठी पोरासह पेलतो
किती विनवतो काठीला
रहा पोरांच्या बाय पाठीला

काठी तोलता तोलता
काळीज बापाचं हालतं
सारे देव होती गोळा
दुख त्यांच्याशी बोलतं

कारभारीण पोटूशी
ढोल जीवापाड बडवी
कणखर गोळा पोटी
लई जिद्दीनं घडवी

घोर तिच्या जीवाला की
कुकू जपण्या धडपड ती
वर आकाशात लेकरं
तिच्या जीवाचा ठाव घेती

त्यो जपतो तिला बी
पोरं घेऊन उराशी
ती सांभाळते त्याला
सान समजून जराशी

एकमेका भरवती
घास सोन्याचा सारे ती
रानपाखरं होऊन
दाणं चोचीत भरती

गरिबीचा अभिशाप
तरी रडायचं न्हाई
डोळा सपान बघणं
कवा सोडायचं न्हाई

सांगं डोंबारी खेळावा
खेळ अगा ह्यो संसारी
तारेवरची कसरत
पाय देवाचं बा धरी

दि. ३/७/१९
सकाळी १०.२३ वा.




## (२०)
## शोधू कुठे निवारा

शोधू कुठे निवारा
उघड्यावर संसार आला
वेड्या पिश्या पाण्याच्या सोबत
आसराही वाहून गेला

आधीच दारिद्र्य माझे
आता जगादेखले झाले
फाटके लुगडे नि कपडे
धाग्या धाग्यात ओले झाले

भांडीकुंडी सारी उपडी
माझी निजून गेली झोपडी
नवा कुठून टाकू तंबू
अन कुठं आता मी थांबू

पोरं बाळं भांबावलेली
त्यात भुकेनं घाई केली
चूल पावण्या पाण्यासंगं
बघा वढ्यात फिराया गेली

आता दगड मांडू तरीबी
पीठ कुठून आणायाचं
झोळी फाटलेली की होती
आता नशीब फुटून गेलं

कुणी उपकार करा की एवढं
माझं झोपडं उभारा तेवढं
घास भरवाया राब राब राबीन
आज पोरांना कुठं मी निजवीन

गेलं सुदाम्याचं घर वाहून
येरं माधवा लवकर धावून
लाज पोह्याची राखशील का तू
दाना मुखात टाकशील का तू

माझ्या डोळ्याच्या यमुनेला पूर
राहू नकोस तू असा दूर
या झोपड्यात ऱ्हाईचास तू बी
लगबगीनं ये बिगी बिगी

दि. ३/७/१९
सायं. ७.०९ वा.



## (२१)
## रांगोळी रांगोळी

अशी रांगोळी रांगोळी
ठिपक्यांना जोडणारी
नक्षी फुलवीत छान
दूरच्यांना साधणारी

आधी झाडलोट होते
सडा ओंजळीने पडे
प्रात:काळी जळी भिजे
भुई ताजी आंघोळीने

उंबऱ्याच्या लक्ष्मीला
पदचिन्हांनी नमून
गोपद्माची श्रीमंती
घ्यावी गोकुळी जाणून

मग दाराशी रांगोळी
काढावी तिथं का हो
सारी सुखं दारातून
येतात घरात हो

साऱ्यांच्या स्वागताला
रांगोळी हसणारी
गृहस्वामीनीची कला
तिच्यात दिसणारी

जोडू बिंदू आणि रेषा
वेगवेगळ्या प्रकारे
अशी सुंदर ही भाषा
येते रंगून आकारे

एक मांडी घालून सुलटी
दुजी त्यावर उलटी
डाव्या हाता देत टेकू
रांगोळी की 'ती' गोमटी

रांगोळीत चित्र तिचे
चित्रात ती दिसते
रंग मनातले सारे
रांगोळीत ती हसते

अशी पहाट इथली
रंग लेऊनच येते
बेरंगी आयुष्याला
इंद्रधनू बनविते

जीवनाची ही रांगोळी
मनातून रेखाटावी
भारतीय संस्कृतीची
सुंदरता ही पटावी

दि. ६/७/१९
रात्री ११.१० वा.

## (२२)
## उत्कट तुझी ही प्रीती

पुण्यबळाने येती कोणी
सहजी आयुष्यात
सारी सारी नाती होती
फिकीच त्याऽऽपुढ्यात

त्या प्रेमाची सर ना कशाला
अनामिक नाती
बंधन लौकिक नाही तरीही
बंध असे होती

किती शोधिले प्रेम अजोड की
व्यवहारंच होती
जन्मोजन्मीची फळता साधना
तव प्रेमाचे मोती

कसे प्रेम हे तुझे सखी गं
श्रम सारे जाती
सांग कशाची तू बनलेली
कसली ही माती

तुझे येणे मज चैतन्याचे
गाव जणू भेटणे
प्राणपणे जी वाट पाहिली
पांग तिचे फिटणे

स्पर्श तुझा होता गं मजला
कणाकणातून जगणे
अणुरेणूंच्या नवजन्माने
जीवन हे देखणे

हे प्रेम तुझे की भक्ती मजला
कधीच कळले नाही
वळण कसे हे मधूर ऐसे
गूढ हे वळले नाही

भावभक्ती ही अथांग सुंदर
उत्कट तुझी ही प्रीती
अवीट गोड या तलम भावना
आकळण्या जन्म हे जाती

दि. १२/१०/१९
सकाळी ११.३२ वा.

## (२३)
## क्षण मनात राहणारे

क्षण माझे मनात राहणारे
क्षण माझे रुंजी घालणारे
क्षणात मजला दूर नेती ते
क्षणात जवळी आणती

क्षणात मीही होते कोणाची
क्षण ते थांबणारे
क्षणात विरही होऊन जाते
क्षण ते झोंबणारे

क्षणा क्षणांचे आयुष्य आपुले
सुरेख विणलेले
क्षणाक्षणातून अनुभवाचे
थेंबही भिनलेले

नसे भरवसा इथे क्षणाचा
क्षणोक्षणी का झुरणे
क्षणात सुंदर जगुनी येथे
कर्मरूपी हे उरणे

प्रेम करावे क्षणाक्षणावर
आणिक सुंदरतेवर
स्वच्छ पवित्र भावमनीच्या
नितांत सौंदर्यावर

दि. १२/१०/१९
रात्री ९.४५ वा.



## (२४)
## मी गातो गाणी

मी गातो गाणी गोजिरवाणी
प्रसन्न प्रभातही बघ व्हावी
घेईन ताना ज्याही कंठी
लयास मरगळ मग जावी

विषय कोणता गाण्याचा हा
कशास चिंता अशी करावी
प्रसंग पाहून गाण्याला का
आळवून क्षणे उगा स्मरावी

आनंदाला हेतू हजार
कशास दुःखही घ्यावे उधार
सूर्य उगवता नवी सकाळ
नव्या रानाला नवा बहार

उगाच विरल्या उदास वेळा
मनात दळुनी कुढणे का
त्याच एकसुरी जगण्याने
नवा मार्ग सापडणे ना

एक किरण ही दिसतो जेव्हा
आदित्याची चाहूल ना
मळभ ढगांचे कशास राहील
मंद आशेचा पवन वहा

रोज सकाळी जगण्यासाठी
एक सकाळ ही होते ना
गाण्यामधुनी सूर छेडिता
लय नवी सापडते ना

कंठामधला आवाज तेव्हा
रियाजातुनी तासावा
सप्तसुरातून इंद्रधनुचा
रम्य देखावा भासावा

दि. ०६/११/१९
सकाळी ७.५१ वा.

## (२५)
## अशाच भेटी होत जाव्यात

अशाच भेटी होत जाव्यात
मनाशी मनातले गुज व्हाव्यात
क्षण असतील ते थोडेसे
अंतरात चिरकाळ वसाव्यात

भेटीमधुनी उत्साहाचे
नवे वाहती सुरेख वारे
ते ते क्षण भूतकाळामधले
उभे ठाकती सारे सारे

ती व्यक्ती, ती मूर्त तिची
नजरेमध्ये अवतरते
आज ती कशी दिसते आहे
मनास तेव्हाचे भरते

कधी न बोलल्या काही भावना
मनात रुंजी घालतील ज्या
जपून ठेवून अशा क्षणांना
भेटून त्यांना उजळू द्या

कधी कुणाची क्षमा मागुनी
हलके हलके मन होते
कधी आभाराच्या शब्दांनी
ते अधिकची श्रीयुत होते

भेटीसाठी तळमळताना
स्वजनांनी सहजी यावे
हृदयाशी हृदयास भेटवीत
हळवे नयनी पूर वहावे

अशा भेटी मग होत रहाव्या
सदोदित प्रिय व्यक्तींच्या
झुरण्यासाठी पुन्हा नव्याने
प्रेमळ वेळा सक्तीच्या

दि. ०७/११/१९
सकाळी ८.१९ वा.



## (२६)
## कुंचला फिरला पहाटे

कुंचला फिरला पहाटे
चित्रकाराचा जरा
उजळुनी प्राची दिशा
रंग वसन भरजरा

मिसळुनी रंगात सारे
रंग नाचू लागले
आज तेही गात वेडे
फेर घुमूही लागले

हा आला बघ रंग केशरी
पिवळाधमक अन तांबडाही
एक गुलाबी रंग त्यातच
मिसळुनी जाय अंबरी

आकाशी रंगाने थोडे
काढले की डोके वर
मोरपिशी मग रंग बसला
सजुनिया त्याच्याच वर

पांढऱ्या मोतीया रंगा
आज शोभा चांगली
सावळ्या हरीनेही आपुली
कृष्ण प्रभा मग टांगली

जांभळ्या रंगात न्हाऊन
कुंचल्याचा फटकारा
आभाळ दालन रंगारंगी
मेघमालेवर शहारा

हात ना दिसती तयाचे
चित्रकारही गूढ हा
नानारंगी रंगलेला
सृष्टीकारही मूढ हा

रंग ते स्वर्गातले का
असती केव्हा न्यून की
उतरुनी नभ अंगणी तो
निरखतो भुई सुंदरी

बंध त्याचे जोडलेले
रोज ये कृती घेऊनी
दाद देतेही धरा तो
चित्र रेखी स्व लपवुनी

गुप्त स्वतः राहुनी
कृती मांडतो आपुल्या पुढे
कार्य कारण भाव जाणून
क्षणक्षणा प्रचीती घडे

दि. १९/११/१९
सकाळी १०.५४ वा.



## (२७)
## ही नाजूकता

ही नाजूकता अशी दिसावी
फुला पाकळीतून उमटावी
तलम पारदर्शी इतुकी की
थेट मनाला भिडून जावी

मन हलके हलके हे भावुक
दुजा मनाशी होत एकरूप
चेतन कोणी असो अचेतन
क्षणात होऊन जाईल समरूप

नाजूकता इतकी ते घेईल
कुठेतरी जरी दुःख कुढेल
या हृदयातून ऐक हुंदके
स्वतः ते बघ इतके रडेल

कधी कुणी असता समाधानी
ढेकर देईल मन अभिमानी
आनंदाने उठती फवारे
तुषार इकडे, शीतल वारे

कुणी न सांगता कळेल सारे
व्यथा असो वा मोद भरारे
जगणे परके नसेल तेव्हा
एकदिलाचे अनुभव व्हा रे

ही नाजूकता पाषाणाच्या
छाताडावर नाचनाचूनी
पाझर फोडेल, तो वितळेल
द्रवुनी तयाचे मन विरघळेल

असुर भावना जाय लयाला
सुरवर माणूस इथेच होईल
हृदयपाकळी कोमल कळी
पृथ्वीवरती स्वर्ग उभारेल

दि. २६/११/१९
सकाळी ६.०३ वा.

## (२८)
## कसे जगावे

कसे जगावे कळतंच नाही
कोण आपुले, जगणे अभागी
जीवन माझे रुसले मजवर
ढळती अश्रू असे निरंतर

जे जे माझे, क्षणात परके
क्षण माणूस वा सुख मागते
देवा मी रे पापी निश्चित
नियती हिसकून सारे घेते

तरीही मजला समजावीत मी
उगाच जगण्या धडपड करते
खुश ना कोणी मजवर येथे
आयुष्याचे रुसवे फुगवे

थकले थकले दमले व्यर्थ
किती विचार मी करते निरर्थ
आजवर ना सापडे अर्थ
झोळी फाटकी हस्तही रिक्त

एक विचार मी केला पक्का
आज नशिबे दिला का धक्का
घडते ऐसे वारंवार की
जगणे माझे करीत एक्का

हे नसे प्रथम की घडले आहे
नशीब सतत मज नडले आहे
मी समजावत जाते स्वतःला
संचित थोडे अडले आहे

सोड आता गं, रडू नको
नशिबा पाया पडू नको
हे पहिल्यांदा ना घडते आहे
रोज हेच मग मात करू गं

हेच असेल जर जगणे माझे
अश्रू माझे पुसून मीही
अशी उभी राहीन सदोदित
चकित दुनिया, हसरी मीही

या हास्यातून दडली दुःखे
अंदाजाने कळतील ना
मीही तरसत ठेवीन नशिबा
रडणे पाहण्या मिळेल ना
कधीच ना, कधीच ना

दि. २७/११/१९
रात्री ९.३१ वा.



## (२९)
## तू शबरी

तू शबरी ना सत्ययुगाची
काय अवस्था कलियुगी
श्रीरामाला दिलेस गोड ते
बोरं चाखून प्रत्येकी

तुझ्या भक्तीचे चरम गोडपण
आंबट बोरा रूचले की
सोडून देऊन आंबटपण ते
मधुररसाने भिजले की

तू वाट पाहिली मम स्वामींची
जन्मभरीची आशा नयनी
अशी प्रतीक्षा करेल कोणी
शबरी होईल तो तो क्षणी

प्रेम भक्तिमय वृद्धा शबरी
बालक झाले हो श्रीराम
तुझी नि त्यांची कथा सुंदरी
बोरे झाली अति अभिराम

आज इथे तू दुरवस्था का
नाही भेटला स्वामी राम
कशी तू सांगत आहेस आता
कलियुगाची व्यथा भयाण

मी त्याचा गं सेवक आणिक
दास सदोदित असेच जाण
सांग काय करू सेवा तुझी मी
उपकारांची फेड निदान

काय आणि कसे सांगू तुजला
हनुमंता तू भक्त महान
मनी आस बघ होती माझ्या
युगानुयुगे मज भेटेल धाम

कलियुगाची कथा निराळी
फासे सगळे उलटे रे
पोटी पुत्र तरी अनाथ माता
कालचक्र बघ पलटे रे

त्या युगात मी होते एकटी
तरीही राम आलेच घरा
क्षणात माझा जन्म उजवुनी
चुकवून गेले दुःखफेरा

मी वाट पाहिली प्राणपणे तशी
गोळे पोटचे जणू दानव
सोडून गेले वृद्धपणी मज
कसे म्हणू मी त्यांना मानव

कुठे तो गेला राम सांग मज
तू त्याचा प्रियभक्तच ना
मातापित्यांच्या वचनासाठी
वनवासी अनुरक्तच ना

त्या वनवासे किती जणांवर
उपकारांची बरसात
शबरीही न्हाली कृपेत त्यांच्या
शेवट झाला हर्षात

आज सोडती मातपित्यांना
वनवासाच्या गर्तेत
येईल माझा राम थांबले
भक्तीबोरे मज हृदयात

आज तू आला, असा भेटला
जसा तो प्रेमळ श्रीराम
पुसुनी मजला पुन्हा तू केले
शबरीजन्म सार्थक काम

तो आणिक तू नसे वेगळा
आज सांगते मी तुजला
तुझ्या येण्याने जन्म सफल हा
त्याच्या पायी बघ जीव वाहिला

ती तेव्हाची दास शबरी अन्
आजची उदास ही म्हातारी
वाट पाहूनी थकले होते
आत्मदर्शनी ती स्वारी

प्रणाम तुजला करते बाबा
पोचेल त्याच्या चरणाशी
भक्ती तुझ्यासम करता यावी
राहीन अंतःकरणाशी

दि. ५/१२/१९
रात्री १०.५३ वा.



## (३०)
## आकाशाने भाळावरती

आकाशाने भाळावरती
केशरी टिळा रेखिला
रोज प्रभाती सृष्टीने
अध्यात्म उदय देखिला

अजून कोवळा सूर्यबाळ हा
रंग गोजिरा लेऊन
अष्टगंध जणू उधळीत चाले
रक्तचंदने घेऊन

ब्रह्मचर्य हा पाळत असतो
संन्याशाची छटा
दिनमणी तेजप्रकाश घेऊनी
कांती देत एकटा

तहानलेला बाळरवी हा
अर्घ्य प्राशितो अवघे
चंडप्रचंड ऊर्जेने ती
लाही काहिली होई गे

नजरेमधुनी साठवून त्या
देखदेखण्या बिंबा
एक तेज उदयते अंतरी
चैतन्याची गंगा

रोज पहाटे भेटून त्याला
नमन करावे नित्य
प्रकाशमय तो करतो जीवन
स्वागत व्हावे अगत्य

एक सूर्य बघ होता येईल
जिथे दाटली निशा
तळपत राहू पसरीत तेजा
मनी आशेची उषा

दि. ४/१२/१९
सकाळी ६.२९ वा.

## (३१)
## प्रेम अपूर्ण की प्रेम पूर्ण

प्रेम अपूर्ण की प्रेम पूर्ण ते
कसे ठरवावे सांगा ना
मनात रुजल्या प्रीतभावना
कशा अधुऱ्या असतील ना

असल्या तर असू दे त्या अर्ध्या
मनात अखिला होतील ना
जितके करता आले प्रकटन
मनात त्याच्या असतील ना

मदहोशी जी शब्दामध्ये
मौनातील प्रेमात अजूनच
एक कटाक्ष जन्मभरीचा
वर्षावाने सोडील भिजूनच

प्रेम स्पर्शही करता न होईल
मनास विळखा प्रीतीचा
थेंबही कोसळला नाही पण
सुवास येईल मातीचा

एक नजर मी टाकीन ऐशी
सांगीन सारे हृदयीचे
जरी असेन मी झाली कुणाची
मनास ठाऊक मम मनीचे

कधी मी पाहीन लज्जाभराने
झुकल्या नयनी प्रीतसुधा
शीतलता तव मनास लाभे
असु दे लपली प्रेमकथा

एक अधुरी अशी कहाणी
दो डोळ्यातील वेगळे पाणी
एक झुरते मी त्यासाठी अन्
एक गाळतो तव आठवणी

मी त्या ओढीपायी जगते
तूही त्यास्तव इथे कुढावे
मनात प्रेमांकुरास थोडे
बळ मिळता ते बहु वाढावे

इतुके शिकले दुनियेमध्ये
पूर्ण झाले की अपूर्ण होते
म्हणून अधुरे राहो नाते
पूर्णत्वाची ओढ सांगते

दि. १७ /१२/१९
रात्री १०.१८ वा.



## (३२)
## सांगा दिव्यांना एवढे

सांगा दिव्यांना एवढे
गर्वात ते चमकू नका
चंद्र आहे आड लपला
एवढे दमकू नका

अंधार पाहून तेज तुमचे
लक्ख वाटे आज की
पण उद्या तो येईल घेऊन
चांदण्यांना संगती

त्या अशा लुकलूक करूनी
मिचकुनी डोळे बघा
गाली हसतील अन् खिजवतील
तेज उसने घ्या जरा

रे दिव्यांनो तरीही त्यांना
मोद वाटे केवढा
उजळुनी अवनीस तुम्ही
टाकीला जो हा सडा

तेज पाहुनी येथले
त्या रम्य गप्पा रंगल्या
रंगात साऱ्या न्हाऊनी
कोणत्या या चांदण्या

त्या जळाच्या अंगणी
बिंब ते तारांगणी
नभ तिथे की या इथे
ती रोहिणी की रागिणी

तेज इतुके फाकले
आभाळ सारे वाकले
आज येथे त्या तमाचे
घरही झाले धाकले

गर्व नाही नाही आमुचा
हा असे अभिमानही
तो तिथे चमकेल चंदा
तेजाळलो येथे आम्ही

दि. १७/१२/१९
रात्री ११.११ वा.



## (३३)
## रोज सकाळी एक सोनेरी

रोज सकाळी एक सोनेरी
लाट मनी उसळते
सूर्य उगवता चैतन्याचे
रस सृष्टी घुसळते

एक अनोखे मंथन होऊन
देहाला प्रेरणा
नवविचारांच्या नवनीते
शतघृत मिळते मना

आयुष्याला कारण बनते
अमृत प्रभातसमयी
आरोग्याच्या मंत्रामधुनी
उजळते जीवनसमई

सूर्य देखणा पूर्वेला बघ
अद्‌भुत रंगविलासी
किती तमाची मरगळ संचित
नेतो तो विलयासी

नभांगणातून पक्षी गाती
भाट बनून तव स्तुती
दिनकर राजा उदया येता
ब्रह्मांडाला गती

देवांची तू दृष्टी असशी
तेज तुझे मम नयनी
अर्ध्य तुला मी देतो प्रभाती
तेज भरू दे जीवनी

तू तेजाचा गोलक देवा
ऊर्जेचा मार्तंड
तुझ्या कृपेने सृष्टी जीवित
स्रोत असा तू प्रचंड

आत्मकारक बनूनी तू तर
कीर्तीदाताही होशी
अज्ञानाच्या तमास गाढुन
ज्ञानसूर्य बघ ठरशी

तुझा एक होईन कवडसा
उजेड घेऊन हाती
प्रकाश देण्या तुझा वारसा
तेजाची आरती

दि. ८/१२/१९
सकाळी ५.५१ वा.

## (३४)
## देव तेवढे देतो की

असते क्षमता जेवढी आपुली
देव तेवढे देतो की
सांभाळू ना शकेल ऐसे
काही न देईल तो नक्की

जे जे दिधले खूपचि दिधले
उपकारांची फेड कशी
समजून उमजून सुखा पेलणे
जिम्मेदारी नाजूकशी

त्याला कळते हित की चांगले
तोच माय अन् बापही तोच
दाणे आधी देतो आपणा
देण्याआधी टिपण्या चोच

तोच वाहतो सारी काळजी
काळीज तोचि होतो अन्
कशास करता चिंता व्यर्थची
जगण्यामध्ये ठेवा मन

आयुष्याचे सोने लुटुनी
विजयादशमी रोज हवी
जाळू चिंतेची अप्रिय होळी
जगण्याची की रीत नवी

असेल झीरझिर झोळी पिरपीर
सुख जोंधळे गळतील ना
भाकर बनण्याआधी दाणे
मातीमोल ते ठरतील ना

एक करू बघ झोळी कणखर
कर्माने चांगल्या सदा
अजूनही तो देईल सारे
वाढवून घे तव क्षमता

दि. १९/१२/१९
रात्री ९.०३ वा.



## (३५)
## जगावेगळ्या कळ्या तिच्या

जगावेगळ्या कळ्या तिच्या
अन् फुलून येते ती उपडी
कधी न काही कुरकूर करते
गरीब बिचारी बकुळी बापुडी

तिच्या पालथ्या फुलण्यामध्ये
जगण्याचे हे तत्त्वचि दडले
कुणी करू दे किती दुर्लक्षित
पाठ त्याकडे करूनी फुलले

रंगसावळ्या परी त्या गोजिऱ्या
पुष्प वेगळ्या बकुळफुला
हळूहळू, ना दंगा करता
उमलत नेशी मूक कळ्या

त्या अबोल तेव्हा, अबोल राहून
जन्मभरीचा सुगंध भरतील
झाडाखाली बसता थोडे
जन्मालाही परिमळ देतील

उत्तम कर्म सुगंध देईल
असता नसता जगतामधुन
हळूच येथून जातानाही
हार बकुळीचा घ्यावा घालून

नाजूक हाराचे ना ओझे
तीही बिचारी सांगत जाईल
जगणे सुंदर करूया मग हे
मौन सुखाने वरचढ होईल

कशास बोला शब्द कुणाला
अर्थाचे जन मालक होतील
जो न बोलला तोही घेतील
शब्दांना ते अनर्था नेतील

म्हणुनी बकुळीसम फुलणे हे
जरा वेगळे शब्दावाचून
हाती कोणी घेईल जेव्हा
तरीही घ्याना मौना वाचून

दि. २०/१२/१९
सकाळी ७.५४ वा.




## (३६)
## पंचमहाभूतांचे विश्व

पृथ्वी आप तेज वायू आकाश
पंचमहाभूतांचे विश्व
पृथ्वीवरती जल राहतसे
आकाशी तो तेजोगोलक

वायू यांच्या मध्ये फिरतो
दूत बनून सांगावे घेऊन
तिन्ही त्रिकाळी चित्र वेगळे
सौंदर्याला घ्यावे पाहून

तेज सांडते पाण्यावरती
पाण्याला सोन्याचा रंग
डोंगरा आडून वाकून पाहतो
धरा राहते त्याने दंग

असा खोडकर सूर्य रोजची
लपाछपी त्याची असते
एक न जागा साऱ्या दिशांना
तेज देण्याची घाई दिसते

रोज सकाळी तो दिसतो
जगण्याची जणू संधी तो
शांत पहुडता निशीसमयीला
चंद्राला तो पाठवतो

जगणे म्हणजे काही न दुसरे
या पाचांचा खेळ असे
वारा आकाशातून शरीरी
आकाशातच झेपतसे

तो आहे या शरीरी आपण
रोज भेटू या उत्साहाने
चित्र पहाटे उदयाचलीचे
नेत्री साठवू नवरंगाने

दि. २१/१२/१९
सकाळी ७.१६ वा.



## (३७)
## मी जगण्यावर फिदा

मी जगण्यावर आहे फिदा
ती जीवनरमणी रम्य अदा
रोज सकाळी प्रसन्न आभा
मनात माझ्या उजळ प्रभा

ती श्वासासंगे गंध आणिते
श्वासाची मज लय जाणिते
मज जागवते ती जागी असते
क्षणोक्षणी ती माझी असते

सुंदरी इतुकी सोबत असुनी
मी भुलतो, चुकतो, वागतो
जे आपुले ते कधी न जाणता
पळत्यापाठी उगा धावतो

ती संधी देते नवनव्याशा
रोज प्रेरणेची ती भाषा
तरीही उगा मी रडत असतो
कशास्तवही कुढत बसतो

ती रंभा अप्सरा स्वर्लोकीची
सोबत माझ्या वरदानीची
मी गाढव बनुनी गधी शोधतो
जीवनललनेला न वेधतो

ती वाट पाहते मनापासुनी
मनात माझ्या असंख्य गाणी
जीवनगाणे विसरून काही
असेल का हो महत्वा याहुनी

शिकलो शिकलो मी जगणे आता
रोज नवी सुरुवात सांगता
ती आहे तर मीही आहे
काय मागू मी तिलाच मागता

दि. २१/११/१९
दुपारी १२.४५ वा.



## (३८)
## ते बालपण

ते बालपण वेगळेच होते
भोवती सगळेच होते
अल्लड गोष्टी मस्ती भरल्या
जगणे ते आगळेच होते

शाळेमधल्या खोड्या खोडकर
गंमत जंमत पोरे वेडसर
त्या शेवटच्या बाकड्यावरून
उनाडकीचे धडे सरासर

मी दोस्तांचा, दोस्तही माझे
शाळा, पुस्तक, मास्तर ओझे
कुणी न मुलगी आयुष्यातून
ताण न कसले कसले बोझे

ते दिवस सोनेरी मनात दडले
क्षण सुंदर ते आजही अडले
ज्या ज्या केल्या गप्पागोष्टी
जे जे काही गुपचूप घडले

ती शाळा, ते दोस्त जवळचे
बाकड्यावरी लेख मनीचे
ती दोस्ती जी अजबच होती
आज मनाला भुरळ पाडते

दि. २९/१२/२०१९
सकाळी १२.१३ वा.

## (३९)
## मी कधी जिंकून आले

मी कधी जिंकून आले
काळ ही जिंके कधी
खेळ नियतीचा असा
हे चक्र चाले पूढती

रोज वाटे काळ हा
थांबून जावा थोडा की
मीही तेथे त्या क्षणाला
जागुनी जगुनी अशी

तो खुणावे पळ पळाला
संचितांचे गाठोडे
एक पेटारा उघडतो
साल पळता रे पुढे

माहीत नाही काय लिहिले
भाग्य काळाने इथे
वाट पाहून दमविणे ना
जगणे क्षण क्षण सारखे

मी आले कुठुनी कशी
ठाऊक त्याला सर्वही
मीही उधळीत साऱ्या चिंता
चालते पथ मार्गही

तोही रमला क्षणभरी
माझ्यासवे येथे असा
चालणे परी भाग त्याला
थांबण्यावर ना भरवसा

काळ मैत्री घट्ट ऐशी
ठेवतो गुपिते उरी
म्हणून उत्सुकता सदा
वाटते वरचे वरी

एक संवत्सर पुढे
जरी चालला तू ऐक रे
साऱ्या स्मृती पटलावरी
मी कोंदणी सांभाळी रे

साथ देशी तूच कायम
सारे बदलून जाती ना
तू जसा असशील सोबत
कोणतीही नाती ना

मी तुझ्यातून आले येथे
जाणेही तव संगती
मग कशाला खंत करणे
रंगविणे क्षण संगती

दि. १/०१/२०२०
सकाळी १०.२१ वा.



## (४०)
## हास्य माझं

काय गरिबी काय श्रीमंती
मला ठाऊक नाही काही
तरीपण डोळ्यामधली
चमक माझ्या सांगतेच ना काही

मनापासून हसणं
आईजवळ बसणं
तिच्याच कडेवरून
साऱ्या जगाला पाहणं

इवल्याशा जिवनीतून
डोकावतात चार दात
कंगवा कुठला केसातून
आईचा नुसताच फिरतो हात

चेहऱ्याला लागतं
निव्वळ पाणी
ना पावडर कसली
ना मऊसर काही

तरी चमकतोय मी
त्वचेनं तुकतुकीत
स्वप्न कळत नाही पण आईला
गाडीत बसवीन चकचकीत

कपडे ना अंगातले
कुण्या बाळाने वापरून दिलेत
मोठ्या खुशीत येऊन
माझे म्हणून घातलेत

माय करतीया मजुरी
मला बसवत शेजारी
बघवत नाहीत कष्ट तिचे
राब राबतीया बिचारी

किती थकून जाते
सांज वाकून येते
घास भरवून मला
आपण उपाशी राहते

इवलासा हात मग मी
फिरवतो डोक्यावरून
तिच्या चेहऱ्यावरच्या
राबट बटा घेतो की सावरून

कामाला गेलो की साहेबाला
दाखवत म्हणते कशी
बबल्या, असं व्हायचंय तुला
सुख मिळावीत तशी

मग मी हसतो, तिला
राजकुमारासारखा दिसतो
मी म्हणतो, आई बघना डोळ्यात
माझ्या, स्वप्नांनी केलीय गर्दी तुझ्या

माझा हसरा चेहरा अन्
बोलके डोळे
मायेनं पापा घेत ती
मन करते हलके

त्या आसवांची किंमत
चुकवीन मोठा होऊन
खुश राहतो मी रडत नसतो
तिला लपून रडता पाहून

एकजण आला अन् म्हणाला
काय निरागस गोड हास्य
छायाचित्रात टिपून मग
केलं त्यावर भाष्य

ते चित्र म्हणं मोठ्ठ्या स्पर्धेत
पहिलं आलंया
मी जिंकण्याआधीच
हास्य माझं जिंकून गेलंया

दि. ८/७/१९
सायं. ४.०७ वा.



## (४१)
## घट्ट मैत्री

घट्ट मैत्री पाखरांची
प्रेम देती निखळ ती
मोह कशाचा आहे का
जागा फांदीवर छोटी

येवो ऊन वारा पाणी
सारे संगती मिळुनी
सख्य निभावती दृढ
मैत्री ठरते अजोड

चारा दिसता कुणाला
बोलावती मैतरांना
नाही हेवेदावे तिथं
चोचीत चारा देण्या

पाणी पिण्यासाठी बघा
कशी उडती आनंदे
सरोवरात पाहती
आपुल्याच प्रतिबिंबे

रंग रूप कोणा कसे
देवाजीने की दिधले
चोच, डोळे, पंख, पाय
कसे गोडुले निर्मिले

आवाजात त्याचे गाणे
कंठ मधुर सुरांचा
किलबिलताना पाहे
चिमणा गंधर्व होताना

आकाशाची ओढ पंखा
मनातली ताकदाहे
घालू गवसणी त्याला
जीव फुलूनिया जाये

मग उडून उडून
उंच उंच आभाळात
पुन्हा वसुंधरेपाशी
सारं मिळे गणगोत

दिसभर काय केलं
काय आभाळी पाहिलं
खाली धरती, वरून
आभाळानं प्रेम दिलं

थोडं सकाळचं उन्ह
झेलू अंगावर तान्हं
तान्ह्या पिलांसाठी
चारा आणू चोचीत भरून

वेडी पक्षीण ही माझी
जीव ओवाळत राही
प्रेम चोचीने चोचीला
मीही सांगताना पाही

भेट घरट्याबाहेर
झाडावर कुठेतरी
मैत्री आपुली अशी की
ओढ साऱ्यांना वाटावी

किती दिस इथं जिणं
कशा कशाला हे भिणं
क्षण घालवू निवांत
मैत्र भाग्यानं लाभणं

दि. २०/७/१९
रात्री १०.१५ वा.



## (४२)
## येरे येरे पिल्ला

येरे येरे पिल्ला
तुला डहाळीचा झुला
फुलाशी संगत करायची
आकाशी झेप तू भरायची

सकाळी सकाळी व्यायाम करून
उडून घ्यायचं मनभरूऽऽन
कवायती साऱ्या वरखाली फेऱ्या
हवेला घ्यायचं साऽऽवरून

ऋतुंची साऱ्या लुटायची मजा
कुढायचं रडायचं नाही ना राजा
उगवत्या सुर्व्या करायचं नमन
चिवचिव कूजन करायचं भजन

आता दाणा पाण्याची सोय बघायची
वाट न पाहता कुणाची आपण
गेले ते दिस आता जीव कासावीस
दाराखिडक्यांना लागलंय कोत्या मनाचं
झाकण

आई काय सांगते ऐकायचं बघ
घरट्याला कापूस काड्यांचा ऐवज
जागा कुठं शोधशील पण
भटकंत राहशील उगा वणवण

राहिलंय ना आता मायेचं छत
दाण्यात मुरलंय रसायन खत
भिंतीला नाहीत कोनाडे देवळ्या
अंगण गेलं गेल्या वेली नं कळ्या

गावात अजून गावपण आहे
अंगणात मोठ्या झोपडी राहे
घरट्याला तिथं जागाच जागा
ना मागताच दाणा मिळतोय बघा

गावाचं शहर होवो ना कधी
माणसं राहू दे सरळ साधी
चल चल लवकर गावाकडं
देवाच्या पायाशी चिमणं साकडं

दि. ०९/०७/१९
स. ६:५०



## (४३)
## माझ्या डोळ्यात विठूला

माझ्या चेहऱ्याचा आनंद जाणून घ्या
माझ्या डोळ्यात विठूला पाहून घ्या

वास विठूच्या वारीचा घराण्याला
नामजपाची शिदोरी भरण्याला

मन धावत राहतं पंढरीला
चालत्या पावलांची स्पंदने अंतरीला

येता पंढरपुरी चंद्रभागेतिरी
सारी भावंडे भेटती वारकरी

स्नान करून भक्तीच्या सागरात
जाऊ धावत विठूच्या गाभाऱ्यात

रूप सुंदर डोळ्यात साठवून घ्या
पायी विठूच्या माथा हा टेकवून घ्या

नातवंडाला पायाशी घातलं म्यां
माझ्याच रुपाला रूप दावलंय म्यां

कपाळी टीळा लागो तुझा लळा
तळमळत्या जिवाचा तू कळवळा

बाळरूपात विठ्ठल बा दिसला
नातवाला कवटाळीता तू हसला

सोन्या, विठूला हृदयी जपायचं
आषाढी कार्तिकी भेटायचं

तुझी सान पाऊले विठुराऊळी
निश्चिंत नि धन्य आजी माऊली

वसा वारीचा तुलाही वसायचा
माणसा माणसात सावळा दिसायचा

दि. १०/०७/१९
रा.११:०७



## (४४)
## गावाची पायवाट

माझ्या गावाची पायवाट
तिचा आपुलकीचा थाट
जिव्हाळ्यानं नटलेली
नागमोडी वहिवाट

अगा हुंदडायचो आमी
गावाभाह्येर रानात
गाणं गायचो कसं बी
पाखरांच्या सुरामंदी

गाडी खिल्लारी बैलांची
झुंजूमंजु होता धावं
रानात कुणब्याच्या
आदी वर्दीनीच जवं

शेतावरं राबणारं
कष्टकरी चालत्यात
डोई भाकर तुकडा
हाती घमेलं फावडं

कदी वरात जोरात
त्यात दोस्त नाचत्यात
नवरीचा मुखडा ह्यो
पाहण्या नवरोबा जोशात

कदी मिरवणुका ह्या
कदी कुस्तीतला इजय
माय एखांदी लावतीया
डोळ वाटंला पाहतीया

ह्या वाटेनं लई दिलं
बालपण सांभाळलं
माझ्या खोड्या न मस्तीला
तिनं प्रेमानं गोंजारलं

आता झालोया मोठा मी
गाव सोडावं लागलंया
माय गावात राहतीया
तिला भेटाया जातोया

वाट वाटेला डोळं लावतीयं
वाट माझी ती बघतीयं
लई वर्सानं वाट न मी
एकमेकाला भेटतोयं

दि. १८/७/१९
सा. ७:२०.

## (४५)
## का येतसे शहारा

का येतसे शहारा
स्पर्शात थांबणारा
कल्पनेतले धुमारे
वेडा तनी पसारा

रोमांच उठती केव्हा
जेव्हा जागे भाव सारा
चित्तातले धुमारे
शरीरावरी फुलोरा

रोमरोमी स्पर्श जागे
लज्जेत भिजता कोणी
देहातल्या वसंता
वर्षेत ओलं पाणी

राजस छेडताना
निमिष नेत्र दोन्ही
सहवास भावलेला
शहारून येतं कोणी

अद्भुत काही घडता
बुद्धीस अनाकळते
ती चकित होत जाते
रोमांच कळी फुलते

भक्तिभावनेला
मूर्तीत पाहताना
रोमांच ये तनूला
दिव्यत्व भावताना

कथा कधी कुणाची
कुणी आर्त सांगताना
व्यथा बोचती जिवाला
काट्यात जाणताना

वेळा कधी अशा की
आपत्ती होत आल्या
मार्ग काढता तयांचा
ये आजही शहारा

मोहरून बहरू येता
पानापानाला शहारा
भिन्न भिन्न भावनांचा
हृदयस्थळी हा फवारा

दि. १९/७/१९
सकाळी ७.४८ वा.



## (४६)
## प्रेमाचं झाड

प्रेमाचं झाड सुकलं तरी
मनातले भाव भरून फुग्यात
त्यावर अडकवावेत जरा

थोडी झुळुक आली
तर डुलतील उडतील
प्रेमाचा धागा घट्ट पकडत

गळतील जरी पानं सगळी
शिशिर समजून वाट पहावी
वसंत येईल पुन्हा बहरत

रोज एक प्रेमाच्या भावनांचा
हळूच फुगवत जावा फुगा
फुटला तरी असेपर्यंत आनंद देतोच

ही प्रेमाची सेवाच असते
पुन्हा पुन्हा रुसलं तरी
आकाशात उडवता आलं की झालं

शिवाय हेही लक्षात ठेवाच की
झाडाचं एक बरं असतं
वाळलं असं वाटलं तरी
फुलायचं मात्र खरं असतं

दि. १९/७/१९
रात्री ८.३३ वा.



## (४७)
## मोरपिसे

नाचतोच ना एकदा तरी मोर
प्रत्येकाच्या मनात अथवा
समोरच्याच्या मनात
होऊन चित्तचोर

कितीतरी पिसे अशीच गळतात
नकळत पाऊस येतो
एक मोरपीस हळूच कोणाच्या
गालावरून मलमल स्पर्शी फिरून जातं
आयुष्याचं गाणं सप्तरंगी
होऊन जातं

कुणा मुकुटी मोरपिसांच्या
रंगत जाती छटा अनोख्या
कधी कुणाच्या हृदयस्थळावर
ओसाड ऐशा भावस्थळीवर
एकाएकी धार बरसते
मेघ गर्जती वीज चमकते

एक नव्हे हो अनेक येती
दिलखुलास नाचण्यास मोर
मोर नाचता कधी कुणाच्या
भाग्यभूमीवर दैव बरसते

श्रीरंगाच्या मुकुटातुनी मग
सौभाग्याची पिसे डोलती
एक मोरपीस कृष्ण मुकुटी
एक राधेच्या चित्तकपाटी

एक आत्म्याच्या कधी न
उघडल्या ऐशा दुर्मिळ पेटी
एक संचित होऊन येते
जन्मोजन्मी माझ्या गाठी

एक भूतकाळ होऊन पाठी
एक भविष्याची रांगोळी गोरटी
एक डोळ्यातून सतत
झळकले प्रिया होऊन गोमटी

मोरपिसे ही ऋणानुबंध
हळुवार अशी सांगती

दि. २१/७/१९
दुपारी २.५७ वा.



## (४८)
## मोती शिंपल्यातला

मोती शिंपल्यातला
चकाकून उठला
एक थेंब वर्षेचा
स्वातीवर दडला

नक्षत्री त्या जन्म चांगला
पाण्यालाही मोती लाभला
शिंपले झाले माता पिता
दोघे मिळुनी जपती त्याला

शिंपले पात्या अभिन्न होऊन
जलथेंबाला जपती स्वतः हून
बंद करून घेती दरवाजे
आत रत्न अनमोल निपजे

मोती सागरी जन्मा येतो
तरी विनम्र कायम रहातो
रत्नाकराच्या भांडारातून
शांत स्वभावे परिचित होतो

चंद्रासम उज्ज्वल कांती
परिधानाने लाभते शांती
चंद्राचे हे रत्न राजस
मौक्तिकमाला दिसती मोहक

परंपरेने मोत्या जपले
दागदागिने अती सुंदर घडले
मुकुटापासून पैंजण जोडवी
नथीमधे तर कलाकुसर घडली

मनात मोती क्षणा क्षणांचे
आनंदाचे मौक्तिकहार
असतील जपले प्रत्येकाने
होत शिंपले वारंवार

दि. २१/७/१९
रात्री १०.३९ वा.



## (४९)
## इच्छा दुर्दम्य

असता इच्छा दुर्दम्य
मार्ग निघती अगम्य
सुकली भूमी, टणक खडक
तरी रोप उगवेच कडक

वर वर दिसते रोप मृदू
इच्छा त्याची खडक खणू
पाणी कोठून आणायचे
उद्या कसे मी जगायचे

रडणे नाही, नाही कुथणे
चिंतेमध्ये उगा न डुबणे
ह्या क्षणाला, परिस्थितीला
नमवून डोके वर काढणे

बीज केवढे, केवढा जीव
नको तरीपण कुणाची कीव
हिंमत अंगची जागवायची
धरित्रीलाही फाकवायची

कोंबासाठी ती नरमेल
रुक्ष ढेकळे दूर करेल
असेच सहजी कशी करेल
आतून धक्का द्यावा लागेल

चिडेल, ओरडेल, वैतागेल
कोंबासाठी पण ऐकेल
थोडं थोडं टणकपण
दूर सारून त्या पोसेल

आत खोल खोल कणाकणात
ओलावा जपलेला मनात
बीज देऊन अंकुरेल
रोप स्नेहाने तरतरेल

डोंगर फाडून असेच येणे
पाझर दगडा फोडून जाणे
कुठले पाणी, कसे साचले
मन त्याचेही असते ओले

बस... ओलावा तो छुपलेला
जगापासुनी जो लपलेला
आपुलकीचे बीज अंकुरण्या
वसा मायेचा वसलेला

दि. २२/७/१९
रात्री १०.५१ वा.



## (५०)
## नवी सुरुवात

नव्या दिसाची नवी सुरुवात
आयुष्यावर कर बरसात
प्रसन्न सकाळ ये झोकात
होडी तिची सुखसागरात

पहिले काम ती हे करते
आधी अरुणा पिटाळते
सूर्यरथाला सज्ज ठेवण्या
सांगून ती पुढे चालते

दिनमणी रथारूढ होऊनी
पिवळ्या केशरी झाकीमधुनी
प्राचीवरती पसरून तेज
डोकावतो आकाशामधुनी

बिंब तेजाचे ऊर्जेचे
दिसते सकाळी स्फूर्तीचे
पक्षी गवसणी घालिती नभा
पंखात रवीबळ भरण्याचे

ढगा ढगांना रंगीत वेश
किरणांचा सर्वत्र प्रवेश
आकाशाची ललना खुलते
रोज स्वतः वर स्वतःच भुलते

उषा लाजरी प्रियकर रवी
तिच्या मागावर तो सरसावी
ती पळते जरी पुढे पुढे
कवेत त्याच्या ती सापडे

सुखद सकाळ रम्य दिशा
वसन सोनेरी नेसे उषा
अलंकार तिचे कांचनपिवळे
मुखचंद्रावर नवीन आशा

अशी पहावी रोज सकाळ
हृदय कोंदणी सुरेख माळ
आयुष्याच्या भाळपट्टकी
ईश्वरा दे नित शुभकाळ

दि. २४/७/१९
दुपारी १.५१ वा.



## (५१)
## एकल्याने चालणे

गगनचुंबी वृक्षराजी
पालवीने व्यापलेली
मार्ग धुतला नितळ झाला
वृष्टी त्यावर ओतलेली

आकाशाला गवसताना
तळ असावा स्वच्छ की
पारदर्शी मार्ग अथवा
भूमीतलही सावरी

हिरव्या हिरव्या रानी जातो
वारा कानी सांगतो
रथ कुणाचा मंद चाली
आज येथे चालतो

भूल पडते सृष्टीसाठी
गोडव्याचा सोहळा
वाट इथली सोडवेना
अन निवांत ह्या वेळा

मन जरासे बोलते ना
ते स्वतःशी डोलते ना
एकरूप होता जरासे
कळते सृष्टिमोल ना

एकट्याने जीवनाचा मार्ग
चालणे सुंदर
जगजनांच्या कोलाहली
व्यर्थ हेतू धूसर

चल पुन्हा स्वीकार पांथा
एकल्याने चालणे
ऐकशील मग तेव्हा तुही
रानसृष्टी बोलणे

दि. २३/७/१९
सकाळी ९.२६ वा.



## (५२)
## रोज उठू या ब्राह्ममुहूर्ती

दिवस उजडतो चैतन्याने
उठून ते साठवून घ्यावे
की अंथरुणात लोळत पडून
प्रकाश सोहळ्या गमवावे

भल्या पहाटे प्रसन्नतेचा
आकाशातून पडतो सडा
वेचून घेऊन शरीर मनाला
उत्साहाचा द्यावा धडा

किलबिल किलबिल चिमणी पाखरे
दैनंदिनी सुरू करती
इवल्या इवल्या कंठामधुनी
सृष्टीगीत ती गाती

नदी झुळझुळे आनंदाने
मार्ग पुढे चालते
सागरास भेटण्या अंतरा
प्रभातीस ती काटे

झाडेवेली ताज्यातवाण्या
झटकून अंगा होती
फळे फुले साऊली
देण्यास सरसावून येती

आकाशातून नानावर्ण
धरित्रीस स्पर्शती
इंद्रधनुचे रंग चांगले
रोज तिच्यावर बरसती

सृष्टी सारी जागी होऊन
कार्यास गती ती देते
आपण उठून तिला पाहता
मन उभारी घेते

झोपून नुसते स्वप्नं पाहता
कोण पुरे करणार
अंथरूनही झेलून तुम्हा
थकलेले असणार

प्रात:काळी उठून मग
स्वप्नपूर्तीसाठी धावावे
कवेत चटकन येईल तुमच्या
त्याला प्रयत्ने गाठावे

उठता सकाळी आरोग्याची
साथ लाभे उत्तम
शरीर, मन दोन्हीही प्रसन्न
प्रेरित अंतर्मन

देवांचे दिव्यत्व सापडे
आकाशातून प्रभा
रोज उठू या ब्राह्ममुहूर्ती
ज्ञान मिळविते आभा

दि. २४/७/१९
दुपारी १२.३७ वा.



## (५३)
## त्याच्या कृपेच्या कैक पाकळ्या

गुलाबपाकळ्या थाळी सजल्या
शुभ्रमोगरी त्यावर अवल्या
टिळ्यासम पिवळे फूल मधोमध
नजरसुखाचे पूर्ण प्रबंध

डोळे फिरती उगा गोल गोल
थाळीस मिळते गती
फुलाफुलातून पाट सुगंधी
आसमंती वाहती

प्रत्येक फूल, हो मशगुल
आपुल्या नादात
नाद पूजेचा ऐकुनी सुटती
नाचत राऊळात

देवापुढती ठेऊ स्थालिका
प्रसन्न चित्ताने
देव हुंगतो फूल सुगंधी
दिले जे भक्ताने

थाळी फुलांची स्वीकारून तो
गुलाब दे भाळी
मोगऱ्याच्या गंधक्षणांना
रेखीतो कपाळी

त्याच्या कृपेच्या कैक पाकळ्या
जीवन थाळीत
मधला गुलाब तो असतो की
केंद्रभागात

मन केंद्रित करता
आत्मरूप मग दिसते देवाचे
आयुष्याची थाळी फिरते
चित्त स्थिर होते

योगी सुगंधी दिव्यत्वाने
जाय अंतर्बाह्य भरून
त्रिखंडात मग काहीच नसते
ते तत्त्व राहते उरून

दि. २५/७/१९
सकाळी ७.३२ वा.



## (५४)
## पुस्तक मित्रा

पुस्तक मित्रा, ज्ञान देतशी
ना मोबदला काही
आज मैत्र दिन गुलाब घेरे
पिवळे दोन तरी

खरे पाहता जिवलग दोस्ता
तूच माझा सखा
तुझ्याविना या जगतामध्ये
मी पूर्ण पोरका

लटका सारा खेळ जगाचा
कामापुरते काम
कोण करील रे तुझ्यासारखे
प्रेम अशर्त अनाम

शब्द तोडणे, वचन मोडणे
जगरहाटीचा भाग
शब्द पाळतोस, शब्दा जागतोस
तू शब्दांचा अविभाग

लोक सांगती सोबत आमची
तुला रे कायमची
कसली सोबत कसली साथ
ते स्वार्थ पाहताती

तू प्राणपणाने साथ देशी मज
शेवटच्या अक्षरा
प्रेम तुझे हे असेच अक्षर
अक्षय बलवत्तरा

नसे एकटा कधी तू असता
तू नसता मी एकाकी
तुला वगळता माणूस नच मी
काय उरेल बाकी

तू ज्ञान मी पिपासू
तू मोद मी आसू
मी शरीर तू प्राण
मी देहशब्द तू त्राण

इथून जाता येशी संगती
ज्ञानसंचिताने
पुनर्जन्म मज देई ईश्वरा
पुस्तकरूपाने

दि. २८/७/१९
रात्री १०.५१ वा.




## (५५)
## चाफ्यामध्ये चाफा

चाफ्यामध्ये चाफा
गोड सोनचाफा
सुवास त्याचा
अपूर्व जसा

रंग सोनसळी
छटा केशरी पिवळी
सुवास वाऱ्यावरी
पोचतो जळी स्थळी

किंमत त्याची कशी करावी
अनमोल ऐसा परिमळ
चाफ्यांचा राजा हा विराजे
रमणी असो वा राऊळ

सोनचाफ्याने ओंजळ भरता
गंध पसरतो चहूकडे
थांब सखे मज गजरा माळू दे
नेहमीच तुजला घाई गडे

आज माळल्या गजऱ्याचा
सुगंध राहील खूप दिवस
क्षण राहावेत असेच सुरभित
तुझे नि माझे हाच नवस

बाजारातून भटकत असता
नक्की थबकतो तिथे प्रिये
जिथे सोनचाफा हा ऐटीत
खिळवून ठेवतो सकल स्त्रिये

सोनचाफ्याची कांती असावी
स्वप्नं जसे भौतिक होते
चरित्रातुनी सुगंध वहावे
सोनचाफी अलौकिकतेचे

दि. २४/७/१९
दुपारी ४.४४ वा.




## (५६)
## कलश फुलांचा

कलश फुलांचा सांडो अंगणी
जीवन फुलून जावे
सात्विक पूजा होऊन मनीचे
भाव भरभरून यावे

सजावटीचे सुंदर चित्र मज
घरी रेखता यावे
त्या चित्राला रंग वेगळे
मलाच भरता यावे

भिंती भिंती फुलफुलासम
हळव्या नाजूक व्हाव्या
छतावरून तर सुखवेली ह्या
घरामधे डोकवाव्या

ब्रह्मस्थानी कलश तांब्याचा
ओसंडून की जावा
आत्ममोगरी सुवास त्याचा
ब्रह्मानंदी न्यावा

घर फुलांचे दार फुलांचे
माणूस हळवा व्हावा
पाषाणासम कठोरभाव
त्याने मग टाळावा

क्षणा क्षणाचे जीवन असू दे
प्रफुल्ल ताजेतवाने
कशास दीर्घायुष्य असावे
कोमेजून ते जाणे

फुलफुलातून मला हसू दे
पाकळीतुनी वसू दे
अंतर्भागी गंध राहू दे
सुगंध मज होऊ दे

दि. २९/७/१९
रात्री ७.४९ वा.



## (५७)
## डोंगर खोदून

डोंगर खोदून वळण वाट
अवघड चढाचा असतो घाट

खोदणे सोपे ना बांधणे सोपे
वाटेवरून त्या जाणे ना सोपे

श्रम घेतले डोंगर फुटले
कडेकडेने मार्गही सुटले

पाषाण पोटी वाट गोमटी
मुठीत जीव न चाला पुढती

तरी वाटते घाटात जावे
वाहन आपुले पुढे काढावे

जाता जाता त्या भव्यतेला
हात जोडून प्रणाम केला

समोर प्रभाती सूर्याचे बिंब
पावसाळी मन इथेच चिंब

शीतल ऋतूत धुके पांघरून
डोंगरवाटा गडप होऊन

रोपरोपटी पाहती वाकून
आलंय कोण चाले जपून

खाली दरी बघ ती खोल खोल
फिरते नजर, पडते भूल

उंची दिसते पर्वत पाहता
दरी सांगे खाईमध्ये खोलता

दोन्हीही रूपे जीवनाची ही
सुखाचे डोंगर दुःखाची खाई

सुखा पोखरून वाट काढावी अन्
दुःखाची खाई सुंदर वाटावी

असा प्रवास राहो स्मरणी
जगून घ्यावे चिंता न मरणी

दि. ३०/७/१९
सकाळी ७.५८ वा.



## (५८)
## कसलं वैर

कसलं वैर न कसल्या गोष्टी
जिंकून जाते केवळ दोस्ती

हाडवैरी असलो तरीही
दोस्ती मनात रुजून जाईल

एक अनोखे जन्मबंधन
सुरेख नाते देऊन जाईल

जिथे शांतता, जिथे निवांतता
अन् विश्वासाने मने गुंतता

मैत्रीपुढे ना काहीच चाले
अशी मिळतसे विश्रांतता

तपोवनातील कथा आजही
हाडवैरीपण गळल्याच्या

सदवृत्तीनं वैरभावावर
प्रेमविजय मिळविल्याच्या

अरे दोस्तांनो आदर्श आपुल्या
दोस्तीचे रुजवू या चला

निवांत क्षण घालवू अमूल्य
मैत्रीचा अनुभव रे चांगला

जीवास जडता जीव मैत्र ते
अन्य काहीही व्यर्थ असे

मनास देते अगा श्रीमंती
जगणे मरणे सार्थ असे

दि. ३/८/१९
सकाळी ८.५१ वा.



## (५९)
## पोपटांची शाळा

आनंदी आनंदी
पोपटांची शाळा
एकमेका खुणा करून
झालेत गोळा

म्हणाले आता
ठरवू या काही
मिळून नियोजन
करू या काही

पेरूंच्या बागा
लावतंय कोण
डाळिंब रसरस
झाडाला दोन

मिरचीची शेती
पिकविता किती
खायला मिळेल
नसावी भीती

काय बरं करावे
सांगा उपाय
विचारविनिमय
थोडा हवाय

उडायला आकाश
मोकळे हवे
राव्यांचे थवे
आभाळी जावे

पाण्याला नसावी
कसली बंदी
विहीर तळे नि
हौद चिरेबंदी

मोठमोठी झाडे
विशाल खोडे
खोडाच्या कपारी
डोलीत पथारी

पहाटे पहाटे
होईल सकाळ
नाही तर शहरात
दुपारी प्रभात

कित्ती करावा
विचार आता
शहर सांगतंय
वायफळ बाता

इथं म्हणे विज्ञान
पुढारलंय
तंत्रज्ञान काही
उभारलंय

रानमेवा यांना
मिळत नाही
कितीही खा
पोट भरत नाही

धावतोय धावतोय
प्रत्येक जण
कुणाला न माहीत
कुणाचं मन

हुबेहूब पोपट
खेळण्यातले
शोभेला ठेवलेत
कपाटात रे

चित्रात दाखवून
सांगतेत वेडे
पक्षी आता
दिसेनात गडे

इंग्रजी शाळेनं
बिघडवलंय
माणसाचं यंत्रं
घडवलंय

आणा आता आणा
नव्या शिकवण्या
निसर्गा सोबती
एक दोन म्हणा

रंगही झालेत
विदेशी सारे
पॅरोट कलर म्हणे
पोपटीला वा रे

चला चला चला
करू गलबला
गावाकडची माणसं
घडवू या जरा

चित्रात नको आता
जीवनात बसू
तेव्हाच होईल
मिठू मिठू हसू

दि. ३०/७/१९
दुपारी १.२१ वा.



## (६०)
## अरे रे दोस्ता

अरे रे दोस्ता कुठे आलो आपण
झाडं ना वेली हे कसलं रे वन

उंचच उंच घरं इमारती
बांधतायत माणसं बघ ना किती

नावाला दिसतंय एखादं झाड
माणसाचा पसारा तिथंही द्वाड

उडून उडून थकलोय किती
पिण्याला पाणी ना दिसतेय माती

चोच किती मारली टणक वस्ती
कॅमेरा घालतोय भलतीच गस्ती

रानातली झाडं विशाल खोडं
कोटरात घरटं निवांत थोडं

पिढ्याही वाढतील झाडं ना पडतील
इथं तर झाडं हकनाक गढतील

चल रे मित्रा, रस्ता घे दुसरा
संसार आपुला वनात हसरा

दि. ३०/७/१९
सकाळी ८.२७ वा.



## (६१)
## जरी असलो मी काटेरी

जरी असलो मी काटेरी
थोडासा बघ पानेरी
झुडूप म्हणू दे कोणी किती
मजला नसते काही भीती

मी खुशीत असतो मस्त मौला
खडकात झुलतोय माझा झुला
पाणी नसले तरी पहा ना
काटा माझा असतो ओला

ना पानांना काटे बोचती
ना काट्यांना दुःख बोचते
झुडुपदेही दुःख गुडूप
ऊनच सावली होते गुपचूप

सुऽऽखच सुख मानले तर
खडकापोटी असे निर्झर
मत बनविता वरचेवर
टाका वेगळी एक नजर

शांत निवांत स्थळ निर्जन
ओसाड वाटे प्रस्तरकण
तरीही उगवतो मी नूतन
डोंगरकुशीत येते वन

सुख असे शोधायचे असते
काट्यासंगे जगायचे असते
नशिबी आली जितकी हिरवळ
उजळ माथी मिरवायची असते

खडकाचा आधार घेऊनी
खोल जावे त्या अंतःकरणी
ओलावा बघ तिथे सापडे
झुडुपाचेही गोड रोपडे

मी उगवता, डोंगर हसतो
मजसी जवळ घेऊन बसतो
कष्ट उपसले, किती सोसले
तो माझ्या पानातून गवसतो

दि. ८/८/१९
रात्री १०.१३ वा.



## (६२)
## असेच सौख्य नांदू दे

असेच सौख्य नांदू दे
असेन मी नसेन मी
कोपो ना निसर्गराजा
कधीही या धरित्रीवर

वर्षा, उष्मा, शैत्यही
सोसवेल एवढे
सूर्य उगवताच उषा
येवो प्रेरणेसवे

कर्म घडू दे सदा
पुसुनी दु:ख आसवे
हासऱ्या नि लाजऱ्या
वेली फुलो गोजिऱ्या

वृक्षराजी हरित वने
पुष्प, फळे ताजी पाने
वाहू दे नद्या निवांत
रम्य कोसळती प्रपात

पूर ना दुष्काळ असो
पाणी मिळो जीवनात
पक्षी गाऊ दे सुरेल
घरटे फांदीवर झुलेल

चिमणी पिले आकाशात
उंच भरारी मिळेल
शेतं पिकू दे अशी
धान्यलक्ष्मी हासू दे

मुखी घास राहू दे
ताट भरले पाहू दे
उंबऱ्यात माप ते
सुख भरून वाहू दे

बाळचाहुली घरे
खुदुखुदून हासू दे
साथ सजनाची ती
सजणीला राहू दे

दूधदुभत्यानं घर
भरलेलं राहू दे
वृद्धपण बालपणासम
मधुर होऊ दे

कर्म असं घडो की
शेवटाला साज दे
देशदेशी विश्वभाव
बंधुताही राहू दे

शांती नांदू दे सदा
कृतार्थ भाव पाहू दे
सार्थ होऊ दे मला
पार्थ कृष्णदास मी

असेच सौख्य नांदू दे
असेन मी नसेन मी

दि. १२/८/१९
दुपारी २.४७ वा.

## (६३)
## हास्य मुखीचे

काय सांगते हास्य मुखीचे
संकट कसले जीव बुडीचे
आकंठ बुडाला जीव जळातून
साधन नेई तरी प्रलयातून

पूर भयंकर नाशक ठरतो
इच्छाशक्ती पुढती हरतो
वय कललेले दुःखी न झाले
जगण्यासाठी यंत्र झेलले

तरी चेहरा आनंदाला
लेऊन महापुरातून गेला
संकट मोठे अचंबित झाले
वृद्ध हास्याने ते गडबडले

शक्य कसे हे असले होणे
महासंकटी केवळ हसणे
दुःखाच्या लाटांवर बसुनी
आनंदाने खुशीत जगणे

यमुनेला पूर आला होता
अष्टमी रात्री काळोख होता
वसुदेवाने बालकृष्णाला
नंदगोकुळी नेला होता

डोक्यावरती कृष्ण टोपली
पाय लागता यमुना बोलली
प्रवाह माझा सार्थ जाहला
बाळरूपाने स्पर्श जो केला

भगवंताची सेवा करते
आज मी जरा हळू वाहते
वसुदेवाचे जीवन कृष्ण
त्या वाचवण्या काहूर प्रश्न

जगजेठी आला वाचवण्या
भक्त तारण्या धर्म रक्षिण्या
आज पुन्हा युगयुगे उलटता
वसुदेवा प्रलयाने गाठता

जीवन यंत्र जगण्यासाठी
हसुनी जातो प्रलयातुनी
तारक यंत्र मारक पाणी
मात देतसे यंत्रपाणी

हास्य अमूल्य अनन्य ऐसे
जगण्याचे ते पुस्तक जैसे
संकट येता ना हरण्याचे
हसुनी मार्गी वावरण्याचे

दि. १०/८/१९
सकाळी ९.०१ वा.



## (६४)
## वासराच्या संगे नाते

एक रूप देव होते
बाळकृष्ण गोकुळाते
वासराच्या संगे नाते
डोळे बासरीच होते

दही दूध तूप लोणी
खाई अंगासी माखोनी
देह सार गोरसाचे
कृष्ण गोरसात वसे

काय पाहतो मुखास
तोची जाणे हरिभास
मिळे शांतता सुरेख
गाईच्या वासरास

जसा कृष्ण वाढताहे
दिसामासी गोकुळात
गोकुळेही गोधनाने
पुष्ट नितही होतात

नंद काळ उलटून
गेला कसे ते म्हणावे
अंगणात प्रत्येकाच्या
बाळकृष्ण खेळताहे

गोठ्यामध्ये गाय राही
वासराला ती चाटत
बाळ माणसाचे जाई
वासराला की भेटत

मैत्र जीवाचे युगाचे
कधी संपणार नाही
असे क्षण हृदयात
घर करतील काही

दि. २०/८/१९
दुपारी ३.१४ वा.




(६५)
## अगा गोड बालपण

अगा गोड बालपण
एक अनोखं जगणं
हसण्यात निखळता
झरा हो खळखळता

नाही कशाचीच चिंता
नसे कसलाही गुंता
वाऱ्यावर भुरभुर
केस जाती आसमंता

रूप देखणे बाळाचे
लीला अगाध चालती
त्यास सहज पाहता
भाव अंतरी डोलती

असे मुक्त बागडणे
मनाजोगे वावरणे
वावरात डोलणाऱ्या
पिकासंगं डवरणे

सात सूर ओळखीचे
बाळ ओठी गीत गाती
नाही दुःखाची किनार
हास्य आरोह सांगती

ऊन वारा पावसाशी
दांगडाई रोज चाले
ओल्या मातीत भिजूनी
चिन्ह सोडती पाऊले

अंगाखांद्यावर माती
पाणी फवारे उडती
उडणारे पक्षी जसे
बालपणी ते उडती

किती गोड काळ असा
जीवनात साठवावा
बालपण राहो मनी
तिथं बाळ मोठा न व्हावा

दि. २०/८/१९
दुपारी २.४५ वा.



## (६६)
## बकुळफुलांची

हिरव्या पानी बकुळफुलांची
माळ गोजिरी गुंफियली
गंध फुलांचा सूत्रबद्ध तो
भक्ती सुवासी रेखीयली

मौन सुगंध अबोल गाथा
ईशचरणी ती वाहून घ्यावी
बकुळफुलांची आस ईशाला
त्या हृदयाला भिडवून द्यावी

तुलसीपत्रे नामजपाने
विठ्ठल विठ्ठल गाऊन जाती
कुणी विठ्ठला तुळशीपाने
रचून भक्ती दाऊन जाती

देह विठ्ठल आत्मा विठ्ठल
भक्तिमाऊली अक्षर गिरवीत
पंढरीत त्या साऱ्या मिळुनी
स्वामीत्वाची साक्ष सांगीत

या देहातून तो प्रकटावा
त्रैलोक्याचा स्वामी पटावा
सार्थ होऊ दे जन्म मानवी
देह हरी सारा वाटावा

दि. २२/८/१९
सकाळी १०.५१ वा.



## (६७)
## सत्त्वभाव चांगला

शुभ्र श्वेत रंग कसा
धवल, ढवळ, पांढरा
निर्मळ निष्कलंकही
सत्त्वभाव चांगला

उगम साऱ्या रंगांचा
रंग छुपे अंतरा
एक रंग दृश्यमान
शांत असा पांढरा

शांतीचे प्रतीक खगाचे
शुभ्र श्वेत कबुतरी
संदेशास धवल घेत
उडतो उंच अंबरी

अंबरात मेघ शुभ्र
कापसाचे पिंजले
त्यांस देखता नयन
गीत मनी गुंजले

शुभ्र फुले वेलीवरी
झाडे त्यात हासती
दंतकळ्या वृक्ष कसे
दाखवीत नाचती

फेसळत्या धबधब्यात
रंग तोच सांडतो
हिरवाईच्या नजाऱ्यात
मोद मनी मांडतो

गाय वासरू धवल
गोड रूप भासते
दुग्धगंगा शुभ्रपणे
जगताशी पोसते

जळ निर्मळ खळखळते
शुभ्र धार वाहवीत
जीवनास स्वच्छ करी
श्वेतवर्णी नाहवीत

साहित्यशारदेचे हासू
श्वेतवर्णी विलसते
हास्यरंग शुभ्र हाच
कवीविश्व मानते

वसन तिचे वाहनही
हंस शुभ्र होतसे
ज्ञान ध्यान जगती या
कांती लख्ख तेजसे

त्रिगुणातील सत्त्वगुण
श्वेत रंग पांघरे
वृत्ती उजळून जाय
सात्त्विक मन मंदिरे

दि. २५/८/१९
सकाळी ७.२९ वा.

## (६८)
## वात्सल्याचा गडद रंग

वात्सल्याचा गडद रंग
बाळ, माऊली त्याचे अंग
नजरेमधुनी बाळा देई
प्रेमभराने ती हास्यसंग

त्या स्नेहाला उपमा नाही
श्रीमंती वा गरिबी न पाही
मातृह्रदय ते समान राही
प्रेम मातेचे औरच काही

अंगावरती वसन मलीन
पैसाअडका, संपत्तीविहीन
नदीजलातून सुवर्णकणांचा
संचय करण्या ती तल्लीन

बाळ सानुले पाठीवरती
मूर्त प्रेम ते शरीरधारी
ती त्याला, ते त्या आईला
साठवती बघ खोल अंतरी

सुवर्ण कैसे मिळे टोपली
सुवर्णक्षण खरे इथे सांडती
वात्सल्याचा चढे मुलामा
मने सोनेरी होऊन जाती

रंग काळसर उजळून जाई
ती बाळाची केवळ आई
हसण्यामधले मोती सांगती
बाळासाठी श्वास थांबती

कर्तव्याची जरीही घाई
चित्त लेकुरी, सोबत नेई
पाठीवरती जीवन घेऊन
आयुष्याला जीवन देई

हसण्यामधले मोती इथले
इच्छा पाचूसम हिरवी
पुष्कराज पाठीशी बांधला
रत्नांनाही रंगत आली

अनुपम स्नेहशिल्प हे होईल
चित्र देखणे मनात राहील
परमेशाची अशी निर्मिती
वात्सल्याने न्हाऊ घालील

दि. २२/८/१९
सकाळी ८.३५ वा.




(६९)

## रूप वेगळे वेगळे

रूप वेगळे वेगळे
द्वैत भाव ते सगळे
समानता दिसतसे
तरी रुपडे आगळे

मी तुपणाची भावना
वेगळेपण जपताना
आत लपलेलं ब्रह्म
थोडं थोडं विसरता ना

वेगळ्याची मजा भारी
मी साऱ्यांपेक्षा न्यारी
जगतात माझ्यासम
नाही दुजी कोणी स्वारी

दर्पणात प्रतिबिंब
वाटावे इतके समान
तरी यमल युग्मही
थोडे थोडे असमान

द्वैत मैत्र देते कधी
कधी शत्रुत्वाची आग
जीवा समजेल का हे
अद्वैत मुक्त भाग

द्वैत सोपान सोपान
अद्वैताचं गं सपान
एक सगुण गुणाचं
एक निर्गुण गुणवान

राधाकृष्ण दाखल्यात
द्वैत अद्वैत मीलन
दिसतात दोन भिन्न
जीव एक ते अभिन्न

द्वैत अहंभाव पोषी
अद्वैत लीनकोशी
भक्ती असीम जागता
द्वैत अद्वैत चरणाशी

दि. २७/८/१९
रात्री १०.२९ वा.



## (७०)
## सुखाची मोजकीच फुलं

सोनचाफ्याच्या फुलासारखी
सुखाची मोजकीच फुलं
येऊ देत नशिबी
पण गंध तो अनमोल
कायम राहू देत
सोनक्षणांचा

किती ओढ असते
अशा सुखद क्षणांची
कधी ते मिळतात
कधी अनुभवून
सोनेरी होतं अवघं जगणं

कधी दुरूनच
त्यांच्या सुवासाने
मन तृप्त होऊन जातं
तर कधी
हे क्षण देण्यासाठी
राबणाऱ्याच्या हातातूनच
सोनचाफ्यागत
फुलं होतात जीवनाची

कधी दुसऱ्याची ओंजळ
भरलेली असते अशा
पिवळ्या धमक सुखांनी
अन् मनाला भरतं येतं
आपलीच ओंजळ
बहरल्या सारखी

कुठेतरी रानावनात
झाड बहरून येतं
पण सोन्याच्या फुलांना
सुगंध अलौकिक येतो

सोनचाफा दरवळतो
तसं आयुष्य दरवळावं
कायम धुंद
पण मंद सुरभीचे
कोश कायम उलगडवत
सोनकळीसारखेच...

दि. १५/९/१९
रात्री १०.४३ वा.



## (७१)
## आनंदाचे मेघ पाहू दे

मयुरबन हे किती देखणे
निवांत वावर दाणे टिपणे
निळी निळाई हिरवाईसंग
आकाशाला उतरू वाटणे

मोरपिसांची दुलई ओढून
जरा पहुडली धरा निवांतून
अशी शाटिका नेसून घ्यावी
मोरपिसांनी सजवून जावी

निर्जन निवांत रम्य वनातून
थवा तयांचा मुक्त बागडे
अजूनही ना उलगडू शकले
रंगसंगतीचे हे कोडे

मोर मयूरी नाचून दंग
पाऊस येता सृष्टीसंग
रूप देखणे पक्षीराज
डोक्यावरती तुऱ्याचा साज

फुले पिसारा आनंदाचा
डोलत डोलत मोर वावरे
शारदा करी वीणावादन
मोर सारखे तिथे पहावे

याच पिसांची होत लेखणी
ग्रंथसंपदा लिहिली जाते
केकारव तो वनात गुंजत
वनदेवी ही गायन करते

चित्र उमटते मनात कायम
चित्रकारही भाळून जाई
रंग जमवण्या कष्ट घेऊनी
स्पर्श मल्मली नजरेतून पाही

गळून जाती विकार सारे
शांतभावना विकसित होते
तपोवनाचे पावित्र्यही मग
हळूच नयनी विलसत जाते

मोर नाचू दे मनी सदोदित
आनंदाचे मेघ पाहू दे
वृष्टी मोदाची झेलून अंगी
जीवन मयूरबनची होऊ दे

दि. २६/८/१९
सकाळी ११.५४ वा.

## (७२)
## जगण्याला अर्थ असावा

जगण्याला अर्थ असावा
खटाटोप नुसता नसावा
सहजीच श्वासावरती
भावफुलोरा वसावा

मी कसे काय करावे
मनापासून ठरवावे
आखलेल्या वाटेवरून
धुंद तो प्रवास असावा

कोणासाठी तरी जगणे
कधी मनासारखे वागणे
आकाशी पंख पसरता
कवेत आयुष्याने येणे

शब्द पाळताना गोड
लहर रोमरोमी उसळो
मनातून कोणी हसता
जीवापाड प्रेम त्या कळो

कोणी आपुले होत जाई
कोणी असणे दिलजमाई
वाढलेले पान दैवे
मानुनी प्रसाद खाई

ओसरती अश्रू जेव्हा
त्यास ओंजळीत घ्यावे
तेही देणे दैवी मानून
घोट मिटुनी नयना प्यावे

एक दिस ऐसा यावा
स्वप्नं भले ते ठरावे
भावलेल्या क्षण जनांना
प्रेम माझे सांगता यावे

मी मला हरवून द्यावे
का बरे मी  सावरावे
क्षणात जगणे पाहताना
जगण्यात क्षण ते मोहरावे

दि. १६/९/१९
रात्री ११.११ वा.



## (७३)
## अवघा पिंपळवृक्ष उभा

आठवणींचा पिंपळ
बहरून येतो वेळी अवेळी
मोठासा हा वृक्ष
लगडून उन्हं सोनसळी

नाजूक पालवीला
कोवळीशी धार
रेघांचं भाकीत
स्मृती हिरव्यागार

रंग हिरवाच
कसा म्हणावा
लालसर केशरी पांढुरक्या
पोपटीशार गोष्टी कळाव्या

हिंदोळ्यावर सुखाच्या
वारा अलगद झुलवत राही
पिंपळपानही डुलत हलत
आनंदाने सळसळत जाई

गळण्याची भीती नाही
सुकण्याचे नाही भय
डौलाने झाडावर
विसावण्याची केवढी सोय

झाडंही कुशीत घेऊन
अगणित पानांना
जपून ठेवत राहतंच ना
हव्या हव्याशा क्षणांना

हे बहराचे रंग
हळू हळू गडदताना
कळतंय कुठं पिंपळपाना
अवघे काळीज निसटताना

भरररकन ऋतूंचे
चक्र वेडे संपून जाते
शिशिराची शिरशिरी
पर्णालंकार लयास नेते

डोळ्यादेखत साऱ्या गोष्टी
आठवणींच्या पिंपळकोष्टी
गळून पायाशी पडतात तेव्हा
जरठ पिवळा रंग होतो नकोसा

कोणीतरी पिंपळपान
हळुवार घेऊन
हृदयाच्या ग्रंथीमध्ये
ठेवतं पहा कित्ती जपून

ऋतू सरतात
पानं गळतात
आठवांची सरबत्ती
झाडास बोडखे
करून ठेवतात

एक पान असतं कोशात
धुंद आपल्याच मदहोशात
वरचं आवरण सोडून जातं
पण आठवणींचं जाळं उरतं

केवढं सुंदर दिसतं हे
आठवांचं जाळं कोरीव
पुन्हा पुन्हा मनास अडकवीत
खुणा ठेवतं जपून भरीव

हृदयाशी हीच जाळी
क्षणभर बिलगून जाते जेव्हा
साऱ्या साऱ्या आठवांचा
अवघा पिंपळवृक्ष उभा

दि. १७/९/१९
सकाळी ६.४३ वा.



## (७४)
## लेखणी

लेखणी शब्दात बुडूनी
भाव सारे मांडते
नसू दे पुनवेची रात्र तरीही
चांदण्याला सांडते

चंद्र सूर्याला तिच्या त्या
कवेत घेऊन सांगते
या असे उतरून अलगद
कागदावर तेज ते

पावसाळी दव तिच्या
शाईत थांबून राहती
अन फुलांची परिमळे ते
गंध देण्या पाहती

प्रेम माझे लेखणीतून
प्रकट होते रेशमी
हृदय सारे जाणते ती
लेखणी मज लेखणी

मूक असले दुःखी कधी तर
बोलते ती सांत्वना
मौन किती अनमोल सांगे
दे दिलासा या मना

माणसे देती दगा पण
सोबती ती चालते
मज दिल्या वचनास सखी ही
नित्यनेमे पाळते

मज खुशीचे दे झुले अन्
अंबराशी ने धरा
किती कृतींना निर्मिते अन्
सार्थ करी माझ्या करा

मस्तकातील भावचित्रे
शब्दामधुतुनी रेखिते
ललितवसने लेऊनी ती
काव्यफुले ही माळते

अक्षरी सोने लुटावे
विजय होई साजरा
तीच होळी सप्तरंगी
अन दिवाळी सण खरा

रोज देते जन्म कितीशा
राणूल्या त्या शब्दुल्या
दान प्रतिभेचे मिळाले
साधना नित चालल्या

गीत माझे अंतरातील
देह शब्दांचे तिचे
राग मैफिल रंगते अन्
सांगता नच सांगते

कल्पनेच्या प्रांगणातून
ती विहरते लीलया
जन्म सजवून शेवटी मज
सोहळा करी देखणा

जगवीते मरणोत्तरी मज
युगयुगे अस्तित्व दे
अस्मिता जपते ती माझी
धाम मुक्तीचेच दे

दि. ३०/७/२१
९/१२/२०२३, २१:२८



## (७५)
## मन कंदील कंदील

मन कंदील कंदील
प्रकाशाचा अट्टाहास
किती काजळी धरते तरी
साफसुफ दिनरात

वर काजळी काजळी
आत ज्योत तेजाळली
अंतरे स्वच्छ होता
तेजकिरणे फाकली

मन शुद्ध नि पवित्र
पारदर्शी आरपार
त्यात उजेड दिसतो
लख्ख अपरंपार

जसा कंदील कुठेही
कसाही कधी येतो
संगतीला प्रकाशाच्या
गोणी सहजीच नेतो

मन कंदील व्हावे ना
जिथे जिथे आम्ही जावे
प्रकाशाला संगतीने
आत घेऊन चालावे

साऱ्या अंधाराला दूर
करू की तेज होता
जीवनाची खरी खरी
खरीच तेजगाथा

दि. २१/९/१९
सकाळी १०.०९ वा.

## (७६)
## मालवताना कुडी जीवाची

मालवताना कुडी जीवाची
तगमग तगमग कशास ती
सोड खुणा आपुल्या कर्माच्या
मुक्त निरव शांतीत गती

धावून धावून दमले तन तरी
मनास नाही स्थिरता कधी
हव्याहव्याच्या हव्यासातच
खऱ्या हव्याची आस खुजी

कळले जरी तरी वळणे नाही
रखडत खरडत जन्म लुळा
किती वाचले ग्रंथ तरीही
माणूस राही असा खुळा

अनुभवाच्या गठडीचेही
पुरून टाकतो तो संचित
पैलतीराच्या गावा निघता
ऐला सोडणे ना किंचित

जे येणारे खरे सोबती
त्यांची किंमत नाही कधी
सोडून देती उंबऱ्यातुनी
शवास मरतो त्यांसाठी

म्हणून सांगते ऐक जीवा रे
ठेव ठेवण्या उत्तम काही
अशी निर्मिती घडू दे हाती
मालवताना कुडी जीवाची

दि. २९/०७ २१
सकाळी ०९.१९ वा.

## (७७)
## ओढ मनाला मनाची

ओढ मनाला मनाची
वाट पाहते कुणाची
जुळल्या जर तारा तर
सुरसरगम ही गाण्याची

कधी भेटते कोणी
नुसतेच बोलणे वरवर
नसते किनार भावनांची
ओढ मनाला मनाची

वरपांगी रूप असो वा
वरवरचे त्रोटक पाहणे
सुनी पेटी काळजाची
ओढ मनाला मनाची

क्षणात कधी जुळणारी
नाती जन्मभराची
कधी जन्म गेला तरी व्यर्थ
ओढ मनाला मनाची

एक सुंदर तलम हृदय जर
संपत्ती सारी फिकी बघ
माणूस असा शोधण्याची
ओढ मनाला मनाची

दि. २०/०१/२०२२
सकाळी १०.४९ वा.

## (७८)
## अक्ष

अक्ष रेखिला आपण आपुला
भवती त्याच्या गुरफटणे
कितीही मोकळे फिरलो वाटते
सीमा बंधन त्यास असे

अक्ष देखुनी गणिते सारी
जगण्यासाठी मांडायची
संसाराच्या मायेभोवती
नाती सारी सांधायची

खरे पाहता अक्ष खरा ना
केवळ कल्पित रेष अशी
ज्ञानीजनांना कळले तत्त्व
ब्रह्मांडाची उकल जशी

अक्ष दोन दिले मुखकमलावर
निर्मात्याने बघण्याला
सुंदर सृष्टी मौलिक दृष्टी
साठवून किती घेण्याला

अक्ष अजून जे मोही पाडती
फासे बनुनी द्यूतात
गमवून सारे सारे हरवून
काही ना उरते हातात

नकोच असल्या अक्षक्रीडेतून
जगण्याला नरक ते करणे
जुगार नासवी आयुष्याला
वाट तिकडची ना धरणे

एक जे तत्त्व असे खरे ते
दृग्गोचर ना अक्षांना
ज्ञानाच्या अनुभूतीवरती
जाणीव नेणीव साक्ष्यांना

आत्मसाक्षी जे होतील निश्चित
काय कल्पना काय खरे
कळेल त्यांना संसारातील
फोलपणाचे गमक बरे

अक्ष आपले कल्पित सारे
सांडून देणे जमवावे
उघडून दोन्ही अक्ष मुखावर
अंतरात मन रमवावे

दि. २५/०१/२०२२
दुपारी १२.३३ वा.




## (७९)
## एक मन...

एक मन... एक प्रतिमन
एक ढवळं ... एक काळं

कोण कोणा... चालवतं
कोण कोणा... बोलवतं

एक आतून... डोकवी बाहेर
एक बाहेरून... आत फिरं

दाब दबाव... उगा कुणाचा
बिंबाला धाक... प्रतिबिंबाचा

सुंदर मन... सुंदर तन
सुंदर कणकण... सुंदर जीवन

दि. ३१/0१/२0२0
सकाळी ११.२३ वा.



## (८०)
## चिन्हे नुरतील ऐलतीरी

जळात बुडल्या पाषानांना
ठाऊक नसते भविष्य
वरवर ओलेसे भिजून
अंतरंगी किती कोरडे ठक्क
कधी उमटतील पाऊले
कशी कुणाची बघ कोठून

जगणे दगडापरी जरी
जीवन फोल न हो तरीही
चिन्हे नुरतील ऐलतीरी
आठवणींची अशी पाखरे
क्षणात भुर्रकन उडुनी
असे पोचतील पैलतीरी

पुन्हा इथे मग काय उरे
वरवरचे झुरणे पुरे
समजून अस्तित्वाच्या खुणा
चिंतन नसतानाचे खरे
म्हणून मार्ग हे बनवावे
झिजवून देहा आणि मना

दि. १७/०२/२०२२
सकाळी ११.४४ वा.

## (८१)
## तूऽऽ, माघार घेऊ नगंस

चाल रं गड्या पुढं पुढं
संकटांचा धाक नगं
तुझ्या मनामंदी आऽऽस भरघोस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

मार्ग असू दे कसा बी, चालणं तुला चालणं
ध्येयासाठी कठीण वाट पायाखाली घालणं
हिरवळ असू दे की, रान सारं ओस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

साथी सोबतीस कुणी, असंल नसंल
कुणी वाटंमंदी थकून, भागून बसंल
नगं तुला कसल्याच, शिदोरीचा सोस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

पोचायचं पैलतीरी, सोड तू रं ऐल
नगं उगा गुंतू बाबा, नाती सारी फोल
गळू ना दे अवसान, बांध नवा जोश
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

चाल रं गड्या पुढं पुढं
संकटांचा धाक नगं
तुझ्या मनामंदी आऽऽस भरघोस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

दि. २३/०२/२०२२
सकाळी ११.१३ वा.



## (८२)
## धावे माझा गिरीधारी

उगा डोळ्यातून येते
कधी घळाघळा पाणी
काही सांगता न येते
अश्रू कारणही आणि

भरलेल्या गजबजी
घरातही एकलेपण
किती राबले तरीही
पदरी धाकलेपण

असुनी सगे सारे
सोयरे नामधारी
आर्त हाक ऐकताच
धावे माझा गिरीधारी

कसले हे हिशोब
कुठले पापपुण्य
गाठोडे संचिताचे
करणे पडे मान्य

गतजन्मीच्या स्मरणी
नाही खुणा
इथं जगणे परी
होऊनीया पाहुणा

मोहजाळे भोवताली
परी अडकणे नाही
कठीण वाट मना
पटले का रे काही

आलो भोगण्याला
कर्मफळ हे केवळ
संपू दे रे देवा
ह्याच जन्मी जे अटळ

पुन्हा तुझ्या पायी
हा जीव विसावू दे
तुज भेटीने हा आत्मा
माझा रे सुखाऊ दे

तुझे तरी कोण
भक्ताविण येथे
नदी कृपेची वाहते
जगजेठी उभा जेथे

दि. २४/०२/२०२२
सायं. ०५.३२ वा.

## (८३)
## शोधू द्या मार्ग मला

शोधू द्या मार्ग मला
चालले हो मी कुठे
किती फुटले रस्ते तरी
ध्येयपथी पद पुढे

कधी कुणी सोबतीस
कधी चालणे एकले
तरी एक मधुरसे मी
जीवनगीत ऐकले

क्षण क्षणात डोलती
मौन किती बोलती
आत बाहेरी सदा
माझे द्वंद्व चालती

निसटून जाय कधी
पायवाट रुळलेली
खडतर नवखीच वाट
मज ना कधी कळलेली

तरी तिच्या संगतीने
जुळवून मी मजला गे
काटेकुटे रुतले तरी
चालणे नित मजला गे

पथ आपुला गवसला की
जीव तगमगणे पुरे
शोधू द्या मार्ग मला
ध्येय मिळविणे खरे

दि. २५/०२/२०२२
सकाळी ०८.१३ वा.

## (८४)
## सरले मळभ सारे

सरले मळभ सारे
आभाळ मोकळे झालेऽऽ
मन सापडेना मजला
कोठे गहाळ झालेऽऽ

त्याला सवय दुःखाची
पसाऱ्यात रमणारे ते
स्वच्छ मोकळा श्वास
ना झेपणारे त्या ते

सावर मना सावर रे
हे सुखद चांदणे आहे
तुज रात्र काळोखी ठाऊक
परि तेज नव्याने पाहे

मज आत हुंदके देऊन
तू थकला असशील वेड्या
त्या दुःखाच्या तुजपायी
माझ्यासम असतील बेड्या

चल तुटले साखळदंड
नवमार्ग खुलुनीया आले
चमचमत्या चांदण्यांनी
आकाश भरूनी गेले

भोगले जे सारे सारे
ती रात्र अमावस होती
बघ पूर्ण चंद्रमा आला
आपसुक तुझिया हाती

दि. ०५/०३/२०२२
सकाळी ११.५५ वा.

## (८५)
## अडगळ वेडी

अडगळ मनातली
कधीतरी आवरावी
जुनाट स्मृतींची
झाल ती सावरावी

चढल्या जाळ्यांना
अलगद हटवावे
मनास त्या गावी
पुन्हा न पाठवावे

ते तिकडे रमते
बिचारे उगाच गमते
आठवणींच्या
ओझ्याने दमते

जागा अडते
कुणाचे काही नडते
अडगळ वेडी
हुंदक्यांनी ती रडते

स्वच्छ करू या
खोली मनाची
जाणून घेऊन
खोली त्याची

अडगळ काही
जिवा भुलविते
पडगळ तशीच
रहावी वाटते

दि. ०१/०३/२०२२
दुपारी ०१.०९ वा.



## (८६)
## भरभरून रसपान

धुंद फिरावे फुलाफुलांवर
पराग कोशातुनी
रंग सोहळे टिपून घ्यावे
लुकलूक डोळ्यांतुनी

स्पर्श रेशमी अंग कोवळे
फुले स्वर्ग सांगती
जन्म सरावा सुंदरतेने
सुमनांच्या संगती

दिनमणी उगवून आला घेऊन
नव चैतन्या दिशा
पसरून गेली रक्त लालिमा
गाली हासते उषा

फुले डवरूनी वाट पाहती
येतील फुलपाखरे
ज्याच्यासाठी यौवनमधु हा
त्याची वाट पाहणे खरे

फुलपाखरू केलेस देवा
अनंत रे उपकार
चार दिसांचे जीवन देऊन
सख्य फुलांचे अपार

देही नक्षी रंग सांडले
भिरभिर उडणे छान
कलाकृती ही तुझीच सुंदर
फुलपाखरे महान

क्षणोक्षणी जर घडे सुखाचे
स्वच्छंदाचे दान
जीवन असू दे कितीही छोटे
भरभरून रसपान

दि. १५/०३/२०२२
सकाळी ०७.१९ वा.



## (८७)
## पावसा स्पर्शीले मी त्या

मज आहे भिजावयाचे
तरी बंद बंद तावदाने
ऋतू ओघळून जाताना
मना कसे सांगू बहाणे

ही खिडकी ओली ओली
मज गूज सांगूनी गेली
झेलून पावसाला ती
म्हणे पुन्हा नवीना झाली

किती उन्हं साहूनी तीही
करपून कोरडी वेडी
आज स्वप्नं पावसाने तिज
समोर आणली झाडी

हिरवळ उमलून येताना
ती दवास झेलून गेली
दागिने अंगावर लेवून
सर मोत्याची ही आली

मी उदास आहे थोडा
जलधारा पारदर्शी ह्या
खिडकीला मन टेकवता
पावसा स्पर्शीले मी त्या

दि. ०६/०३/२०२२
रात्री ०९.१९ वा.



## (८८)
## देवा रं देवा

अंगणात वाळवण उन्हाळी सांडगे
खायाला बसलेत फुकट लांडगे

मेहनत घेऊन राबावं भरभर
सांजच्याला पाहिलं तर गायब शेरभर

शेजारणी समद्या करायच्या मदत
आता ना कुणाची कुणाला गरज

मिळून कामं व्हायाची छान
पानाला जोडून जेवायचं पान

आता बया जमाना बदलला आज
घरी काम करण्याची वाटतीया लाज

शेजारणी पाजारणी पळवत्यात सारं
चोरून खाऊन ढेकर द्या रं

पाखरांची भीती न्हाय कवाच वाटत
माणसांची नियत तोडतीया फाटक

म्हणून लढवली शक्कल म्या
वाघोबा राखणीला बसवला हाय

बघू की घाबरून व्हतंय का काय
वाघाची शेळी ती व्हनार न्हाय ना
व्हनार न्हाय

कशाचा आता भरवसा न्हाय
हातमिळवणी लांडग्यांशी बाय

सुकलंया म्हणं बाय वाघाचं नरडं
डरकाळी सोडून म्यांव म्यांव वरडं

देवा रं देवा... वाचव जरा
वाघाच्या देखाव्याला भिऊ दे नजरा

दि. १६/०३/२०२२
सकाळी ०६.५३ वा.



## (८९)
## उत्साहाची एक लहर मग

खळखळ खळखळ झरा वाहतो
झुळझुळणारे पाणी
पाय बुडवुनी शीतल स्पर्शी
थंडाव्याची कहाणी

किती असावे थकले जरीही
किंचित जळी बुडावे
थकव्याने शिणव्याने सहजी
विरूनी उंच उडावे

उत्साहाची एक लहर मग
मनात उसळून येईल
निसर्ग सुंदर भाव गूढ ते
मंथन घुसळून होईल

उगा फिरावे असे एकटे
रम्य निवांत स्थळी
अलगद पहावे आपुले हसरे
प्रतिबिंब हे जळी

गूजगोष्टी मग चालू द्याव्या
खुलास दिल खोलून
शब्देविण बघ कितीक द्याव्या
खोल भावना बोलून

दि. २८/०३/२०२२
०७.२६ वा.



## (९०)
## एक भरारी

अशी भरारी उंच आकाशी
मनास फुटतील पंख नवे
पक्षीराज होण्यासाठी मग
स्वप्नं फुलावे नभासवे

अंदाजाने बांधून अंदाज
विहरत जावे मुक्तपणे
हवेसोबती पंखांना त्या
पसरत जावे स्वस्थपणे

नजर करारी ध्येयावरती
भिरभिरणारी सतत असो
भूक तहानही विलया जाऊन
उडण्याची मनी झिंग वसो

बळ पंखातील पंखी असू दे
मनातून प्रेरणा तया
कणखर दृढ संकल्पायोगे
उडण्यातून चेतना नव्या

दृश्य विहंगम सुंदर सारे
साठवून अंतरात घे
पक्षी होऊन जगण्यासाठी
एक भरारी उरात घे

दि. २७/०३/२०२२
सकाळी ०७.५० वा.



## (९१)
## गाव नवखा जाहला

विसरलो गावास आणिक
माणसे इथली हरवली
शेण गाई अन् म्हशींचे
कौतुकाची हो परवली

पाहिली ना माती इथली
गावपण ना पाहिले
पाहण्याचे प्रेम इथले
भाव हळवे राहिले

साधे जगणे राहणी ही
सरळ साधी माणसे
जग पुढारून गेले म्हणती
गवसली का माणसे?

दूर केले सृष्टीला
निसर्गही दूर सारला
हक्क सुंदर जगण्याचा
प्रगत मानवे मारला

पायवाटा पुसून गेल्या
महामार्ग गुळगुळ बांधले
हृदय काढून खुंटीवरती
सोयीने मग टांगले

चुकून आली पिढी ही पुढची
गाव नवखा जाहला
नवचे आश्चर्य जणू मग
शेणपावटा पाहिला

कौतुकाने चित्र त्याचे
भ्रमणध्वनीतून घेतले
गावठी मातीने चक्क
हात मस्तकी टेकले

दि. ३१/०३/२१
सकाळी ११.५७ वा.



(९२)

**तिथल्या पाऊलखुणा देखण्या**

वाळुकेतली पदचिन्हे ही,
जळात बुडून गेली
अस्तित्वाच्या खुणा बोलक्या,
उमटवून परि गेली

काय सांगती बघा पाऊले,
शोधू दिलासा थोडा
उष्ण तापल्या आयुष्याला,
ओलावा केवढा

अथांग सागर सखोल पाणी,
पार शोधिला कुणी
क्षणात चित्र अफाट येते,
सृष्टीचे हे मनी

लाटालाटांवरून फिरावे,
देहा तरंगवून
चित्र रेखवी सुंदरतेच्या
रंगात रंगवून

ती गाज ऐकू यावी कधीही,
सागर मनात रहावा
मिटून पापण्या अलगद कधीतरी,
हृदयी सागर पहावा

मिटल्या तर मिटू दे ना खुणा त्या,
नको वेगळे मानू
सागर कवेत घेतो तुजला,
एकरूप हो जणू

सारे समर्पित करणाऱ्याची
चिन्हे कुठे राहतात
देऊन सारे रिक्त होऊनी
जगतातून जातात

राहतात तरी खुणा
आपुल्या हृदयांतरी कुणाच्या
तिथल्या पाऊलखुणा देखण्या
कधी न मिटणाऱ्या त्या

दि. ०१/१२/२१
सकाळी ११.२१ वा.

## (९३)
## ओलावा तिथे खास

होऊन ऋतू जाईन
परदेशी थोडे राहीन
ते स्वच्छ रस्ते आणि
घरे चकचकीत पाहीन

पाऊस होत बरसून
पाहीन थोडे थोडे
पाण्यास मुरण्याला मग
जागा कुठे हे कोडे

नुसतेच सडकेवरूनी
धावत सुटणे होईल
वाहण्यास सोबतीला
कोणीच नाही येईल

ना पाचोळा ना धूळ
ना कोणतीच भूल
ना पडले तुकडे कागद
कचराही शिस्त पाळत

घरे देखणी सधन ती
परि माया तेथ नाही
मज देशी झोपडीत
गळण्यास जागा काही

सहजी मी आत जातो
त्या फाटक्या घरात
काढीत दृष्ट माझी
उभी माय उंबऱ्यात

रस्त्यावरून मजला
जाण्यास किती बंध
अडवून किती जाती
म्हणती मला ते थांब

पाऊस मी हसूनी
निसटून जाण्या शर्थ
मज भारतात आहे
जाण्यास माझ्या अर्थ

येथे किती पडावे
परदेशी तडफडावे
चकचक प्रदेश सारे
मन कोरडेच रहावे

ही जर असे सुंदरी
नटलेली रम्य नगरी
तर मजसी गावखेडं
वाडीच माझी प्यारी

घरदार परस अंगण
ओलावुनी मी वाहीन
काळ्या आईच्या पोटात
जन्मास पुन्हा येईन

अंकुर फुटेल मजला
पाऊस झाड होईल
वाढून ढगास अडवून
बरसात पुन्हा देईल

ते प्रेम काळजी ती
माईच्या काळजात
पडला जरी न पाऊस
ओलावा तिथे खास

इथे कोसळून रडतो
पाऊस स्वतःच वेडा
नाती इथे फुकाची
कोरडाच प्रीत घडा

दि. ०७/१२/२१
रात्री ०८.१५ वा.

## (९४)
## फसवी वेळ

वेळ फसवी ही
कधी कधी अशी
कुणावरही येते

अपमानाचे घोट
गिळाया
कुणाकडे मग नेते

जिथे जे पिकते
नसते किंमत
अमूल्य त्या गोष्टीला

डाग लागतो
चंद्रावरती
ग्रहण कधी सृष्टीला

जे जे सुंदर
उत्तम आहे
त्यासी वेदना फार

कळा सोसुनी
प्रसव उत्सवी
माया जन्मे अपार

कधी कुणाच्या
दारी बसणे
तिष्ठत बराच काळ

कधी कुणाशी
जडते नाते
अतूट पक्की नाळ

हिडीस फिडीस कुणी
जरी वागवते
मन मजसी सांभाळी

मनात माझ्या
सांगून जाते
लेख सुरेख जे भाळी

ढळती अश्रू
माझे निरंतर
मान दावावर लागे

आयुष्यही हे
असे कसे मग
वेड्यासारखे वागे

इकडून मिळतो
एकचि फटका
जीव फाटका वाटे

क्षणात पलटे
डाव हा माझा
यश मला हे भेटे

जितके खाली
कुणी खेचते
नशीब उसळी ही घेते

क्षणात मजला
सारे सारे
अलगद देऊन जाते

दि. १८/०९/२१
रात्री १२.२३ वा.



## (९५)
## शिकवण सोपी धर्माची

कर्तव्याला जाण श्रेष्ठ तू
नकोच अन्य विचार
कितीही चालू दे संगर भवती
तू ध्येया कर पार

कोण आपुले कोण हे परके
नको गुंतू तू यातून फार
कर्म तेवढे करणे तुजला
योद्धा अपरंपार

समोर दिसती शत्रू तरीही
ते स्वजन आपुले नात्याचे
खचून न जाणे तुला इथे मग
स्वपर भाव ना मनी त्यांचे

कर्तव्याचा केवळ ध्यास न
आस तेवढी कर्माची
नको चुकू तू कर्मापासून
शिकवण सोपी धर्माची

फळ कोणते चांगले वाईट
कशास चिंता व्यर्थ बरे
तू हिशोबाच्या गुंत्यामधुनी
न गुंतणे हे श्रेष्ठ खरे

मनास कमजोर नको करू तू
अढळ श्रद्धा राहो मजवर
होत सारथी युद्धामध्ये
कृपा राही माझी तुजवर

सोपवून दे अलगद सारे
सारे तू बघ माझ्यावर
कर्म तेवढे करणे तुजला
भक्ती राहू दे माझ्यावर

अशा भक्ताच्या भक्तीसाठी
मीही उभा रे युगे युगे
अवतारांच्या कथा पहा ना
मी भक्तिस्तव इथे जगे
मी भक्तिस्तव इथे जगे

दि. ३१/०८/२१
सकाळी ०८.१३ वा.



## (९६)
## बेट

एक बेट प्रत्येकाचे
भवतालचे पाणीच पाणी
तिथले साम्राज्य प्रत्येकाचे
सूर नवे नवीच गाणी

विश्व सारे, हा पसारा
त्या पाण्यासम सभोवताली
तरी जणू ना लिप्तच काही
अलिप्त बेटावरती खुशाली

जग वेगळे प्रत्येकाचे
प्रत्येकाने सजवून ठेवून
बाहेर कितीही आणि कसेही
जग आगळे रिझवून ठेवून

कधी वाटते खूप एकटे
बेटही ओसाड वाटू लागता
आपले आपले म्हटले सारे
आपले न काही उमजू लागता

या बेटावर कठीण जाते
मग विराणी संध्याकाळ
घट्ट बांधले होते धागे
निसटून जाती उरात जाळ

तरीही हसुनी बेट आपुले
पुन्हा नव्याने सजवावे
आनंदाचे बीज शोधुनी
पुन्हा नव्याने रुजवावे

दि. २७/१२/२०२२
सकाळी ०७.३८ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/ सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका (जीवनपर कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (जीवनपर) - उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२१
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिति (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>53335052919&id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ‘‘सर्ग_निसर्ग’’ ऑडिओ अल्बम – ‘‘मंजुमंजिरी’’ | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ७०
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३३
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •